९ ऑगस्ट १९६९

समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष : नववे – अंक : दहावा

संपादक : श्री. ग. माजगावकर

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

१०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

किंमत : ४० पैसे  वार्षिक वर्गणी : वीस रुपये  परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

एकूण 'माणूस' साप्ताहिक रूपात चांगला.


गेल्या तीन-चार 'माणूस' मधील 'कलकत्ता दिनांक' मालिका झकास – त्यातील निवेदनाच्या वेछूटपणासाठी व परखड निरीक्षणाकरिता.

मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो तो या आठवड्याच्या (२६–७–६९) 'माणूस'च्या मलपृष्ठावरील श्री. वसंत सरवटयांच्या (व. स. नी रेखाटलेले) लक्षणीय व्यंगचित्राचा या व्यंगचित्राची व टाइम्स ऑफ इंडिया (२५–७–६९) मधल्या श्री. लक्ष्मणच्या 'यू सेड इट्' कार्टूनशी तुलना करता कधी कधी दोन प्रतिभावंतांच्या कल्पनेचा कसा मेळ बसतो ते पाहण्यासारखं आहे. कल्पना एकच–राष्ट्रीयकरण. सामान्य व्यक्तीच्या डोळयातून झालेलं, नेत्यांचं, संस्थानिकांचं वगैरे.

चंद्रशेखर व वसंत सरवटे यांचे अभिनंदन.

दि. २७ जुलै  श्री. वा. पानवलकर, मुंबई

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.



# दिल्ली

## दिनांक २९ जुलै

दिल्लीश्वरीच्या दिग्विजयाचा पूर्वरंग संपून उत्तररंग सुरू झाला आहे. मोरारजींचा किल्ला अखेर सर केल्यानंतर उपप्रधान मंत्र्याचे पदच खालसा करण्याचा निर्णय इंदिराजींनी घेतला असल्याचे कळते. असे म्हणतात की, मोरारजींची ' सिनीऑरिटी ' आणि एकूण समाजातली प्रतिष्ठा लक्षात घेऊन हे पद खास त्यांच्यासाठी निर्माण केले होते; तेव्हा ते गेले तसे त्यांचे पदही त्यांच्याबरोबर गेले अशी बाईंची भूमिका आहे. म्हणजे उपप्रधानमंत्र्याची ' व्हेकन्सी 'च नाही तेव्हा ती भरण्याचा प्रश्न नाही. आपल्या एखाद्या सहकाऱ्याला प्रमोशन देऊन या पदावर बसविण्याचा इंदिराजींचा मानस नाही; मात्र काही मध्यस्थांच्या कृष्णशिष्टाईला फळ येऊन मोरारजींचे वाट चुकलेले कोकरू कळपात परत फिरले तर हे पद त्यांच्यासाठी पुन्हा उकरून काढण्याची त्यांची तयारी आहे.

अर्थखाते अर्थात् बाईंनी सध्या स्वतःकडे घेतले आहे आणि ते इतक्यात तरी दुसऱ्या कुणाच्या हातात सुपूर्द होईल असे दिसत नाही. इतकेच नव्हे तर खात्याची बरीचशी पुनर्रचना करण्याचा उद्योग इंदिराजींनी हाती घेतला आहे. मात्र अर्थमंत्रीपद स्वतःकडे घेताना स्वतंत्र भारताच्या अर्धा डझन भूतपूर्व अर्थमंत्र्यांपैकी प्रत्येकाला स्वतःच्या हाताने मंत्रीपदावर तिलांजली सोडावी लागली हा सूचक इतिहास बाई विसरलेल्या दिसतात.

इंदिराजींच्या नव्या विटीच्या नव्या राज्यातली याहूनही सूचक अशी आणखी एक गोष्ट म्हणजे त्यांनी गृहखात्यातही बरीच उलथापालथ करण्याचे ठरविले आहे. पण त्यासाठी त्या सध्या राजकीय मुहूर्त शोधीत आहेत. या पुनर्रचनेत ज्या मुद्याचा विशेष ऊहापोह होत आहे तो म्हणजे गुप्तचर खाते आणि केंद्र-प्रांत संबंध विभाग या दोन गोष्टी गृहखात्याच्या हुकमतीतून काढून घेण्यात याव्यात. एवढे महत्त्वाचे बदल इंदिराजींनी केले तर त्याचा राजकीय अर्थ एकच होईल, व तो म्हणजे त्यांना चव्हाणांनाही मोरारजींच्या मागोमाग पाठवायचे आहे. पण चव्हाणांना मंत्री-मंडळातून अर्धचंद्र दिला तर त्याचे राजकीय परिणाम नक्की काय होतील याचा बाईंना अजून नीट अंदाज आलेला नाही. एवढे मात्र खरे की इंदिराजी व यशवंतराव

यांच्यांत सध्या द्वंद्व चालू आहे, की द्वंद्वगीत याचे उत्तर अजूनही स्पष्ट झालेले नाही.

परंतु येथे लक्षात घेण्याजोगा एक मुद्दा म्हणजे अर्थखाते ही आता स्वतःची जहागीर झाल्याने बाईंनी त्याच्यात हवा तसा बदल केला तरी गृहखात्यात बदल करावयाचा असेल तर तो केवळ त्याच एका खात्यांत न करता एकूण सर्वच शासन-यंत्रणेच्या पुनर्रचनेचा एक भाग म्हणून करावा लागेल. आणि नेमके हेच इंदिराजींच्या मनात दिसत आहे. अशा प्रकारचा सर्वांगीण फेरबदल करणे आवश्यक असल्याचे त्यांनी बोलूनही दाखविले आहे. म्हणजे बऱ्याच खात्यांची जोड-तोड होणार असे दिसते. अर्थात् या सर्व घडामोडींत गृहखात्याची पुनर्रचना राजकीय दृष्टचा सर्वांत महत्त्वाची ठरेल हे सुज्ञांस सांगणे नलगे. हा बदल करण्यासाठी बाई-जवळ एक सबबही आहे; व ती म्हणजे सुरक्षामंत्री असताना चव्हाणांनीच एकदा सुचविले होते, की गुप्तचरखाते गृहमंत्रालयाकडून काढून घ्यावे. त्या वेळी ही सूचना फेटाळण्यात आली होती, पण काही महिन्यांपूर्वी परदेशविषयक गुप्तचर विभाग प्रधानमंत्र्यांच्या मंत्रालयात समाविष्ट करण्यात आला आहे.

आणखी एक फरक इंदिराजी करणार आहेत, तो म्हणजे मंत्रीमंडळात हा मोठा हा छोटा, असा भेदभाव काढून समानता प्रस्थापित करणार आहेत. म्हणजे मंत्री-मंडळाच्या बैठकीच्या वेळी, पार्लमेंटमध्ये आणि इतर औपचारिक प्रसंगी मंत्र्यांना यापुढे त्यांच्या नावाच्या आद्याक्षरांप्रमाणे बसविण्यात येणार आहे. मात्र या नाममात्र सुधारणेमुळे फकरुद्दीन अहमद व भगत हे मंत्री इंदिराजींच्या अगदी जवळ बसतील, तर चव्हाण आणि जगजीवनराम यांच्यासारखे सीनियर मंत्री दूर बसतील. शिवाय इंदिराजींच्या गैरहजेरीत मंत्रीमंडळाच्या बैठकीचे अध्यक्ष कोण हा यक्ष प्रश्न अनुत्तरित आहे.

## डझनावारी राष्ट्रपती

राष्ट्रपतिपदासाठी डझनावारी उमेदवार उभे राहण्याचा हा स्वतंत्र भारताचा पहिलाच अनोखा प्रसंग. अर्थात् रेड्डी, गिरी व चिंतामणराव ही त्रयी सोडली तर या शर्यतीतले बाकीचे घोडे 'ऑल्सो रॅन' या सदरात मोडण्यासारखे आहेत. रेड्डींच्या मागे कॉंग्रेसची 'ब्रूट मेजॉरिटी' कमी असूनही रेड्डी या अधिकृत व गिरी या अनधिकृत कॉंग्रेसी उमेदवाराविरूद्ध तिसरा उमेदवार उभा करण्यांत जनसंघ-स्वतंत्र आदी मंडळींनी अखेर यश मिळविले आहे. व 'रबरस्टॅंप' नसलेला राष्ट्र-पती गादीवर बसविण्याचा आपला अट्टाहास जाहीर केला आहे. या निवडणुकीत टाकल्या जाणाऱ्या सुमारे साडे-आठ लाख मतांपैकी साडेचार लाख म्हणजे सुमारे बावन्न टक्के मते कॉंग्रेसच्या हातांत आहेत, तेव्हा सर्व कॉंग्रेसी मतदारांनी पक्षाच्या 'चावका'पुढे नमते घेतले तर रेड्डी पहिल्याच मतमोजणीत निवडून येतील हे उघड आहे. पण प्रश्न असा की, सर्व कॉंग्रेसी कोकरे आता इतकी आज्ञाधारक राहिली आहेत काय? रेड्डींना उभे करताना जो सावळागोंधळ माजला त्याचा

उबग आलेले काही काँग्रेसी मतदार पक्षप्रणीत उमेदवाराकडे पाठ फिरवून गिरींना मत देणार आहेत, अशी येथे दाट वदंता आहे. मागे झाकीर हुसेन काँग्रेसी उमेदवार होते तेव्हा अशा हाणामाऱ्या नसतानाही काही काँग्रेसी मंडळींनी सुब्बा राव यांना कौल दिला होता. तेव्हा रेड्डींना या वेळी पन्नास टक्क्यांपेक्षा कमी मते मिळणे अशक्य नाही. असे झाले तर सेकंड प्रेफरन्स मतांना निर्णायक महत्त्व प्राप्त होईल.

या वेळच्या निवडणुकीत काँग्रेसमधली फंदफितुरी किती महत्त्वाची ठरणार आहे हे सांगणे शक्य नसले तरी काँग्रेसमधले बरेच ट्रेड युनियन कार्यकर्ते गिरींचे मित्र आहेत, आणि गिरी उत्तर प्रदेश, म्हैसूर व केरळ या तीन राज्यांचे राज्यपाल असताना त्यांनी तेथल्या काँग्रेस मंडळींत बरेच मित्र जोडले आहेत हे लक्षात ठेवले पाहिजे. याच्या उलट रेड्डींना इंदिराजींपासून 'तरुण तुर्कां'पर्यंत सबंध पक्षाचा पाठिंबा आहे. शिवाय जनसंघ व स्वतंत्र पक्षाने आपली सेकंड प्रेफरन्स मते रेड्डींना द्यायची असे ठरविले आहे. गिरींना सर्व साम्यवादी पक्ष, संसोपा, द्रविड मुन्नेत्र कळघम् व मुस्लिम लीग यांनी आपली मते कबूल केली आहेत. या मतांची संख्या सुमारे दीड लाख आहे. चिंतामणराव देशमुखांच्या बाजूला स्वतंत्र, जनसंघ व भारतीय क्रांतिदल यांची मते आहेत व त्यांची संख्या सुमारे सव्वा लाख आहे. काही मंडळींच्या मते देशमुख उभे राहिल्याने रेड्डींचा विजय अधिकच सोपा होईल. कारण काँग्रेस–विरोधी मतांची विभागणी होईल. जनसंघ–स्वतंत्र मंडळींना ही शक्यता दिसत नाही असे नाही, परंतु काँग्रेसच्या विरुद्ध आपला उमेदवार उभा करण्याचा त्यांचा संकल्प होता आणि गिरींना डावरा पाठिंबा मिळाल्यावर त्यांना पाठिंबा देणे या मंडळींना शक्य नव्हते. झाकीर हुसेनच्या वेळी काँग्रेसविरोधी मंडळींत एकमत होते, त्यामुळे सर्वांचा एकमुखी पाठिंबा सुब्बा राव यांना मिळाला होता. पण आता तशी परिस्थिती राहिली नसल्याने तिकोनी लढत होणे अपरिहार्य दिसते.

## राष्ट्रीयीकरणाची उत्तरक्रिया

बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचे सूप वाजले तरी मतामतांचा गलबला थांबलेला नाही. जयप्रकाश नारायण यांनी विरोधकांच्या यादीत नुकतीच स्वतःची भर टाकली आहे. काही विरोधी–पक्षीय–पार्लमेंट सभासदांनी एक परिसंवाद केला त्यांत मिनू मसानी म्हणाले : 'इंदिराजी साम्यवादी आहेत. मी आपले पैसे राष्ट्रीयीकृत बँकेतून काढून 'त्या' यादीत नसलेल्या एका बँकेत ठेवले आहेत.' जनसंघाचे पार्लमेंट–सदस्य यज्ञ दत्त शर्मा यांनी टोला मारला की, राष्ट्रीयीकरणाच्या बाबतीत साम्यवादी मंडळी इंदिराजींना एवढा तोंड भरून पाठिंबा देत आहेत की या 'भाई–बहेन' हमदर्दीपासून वेळीच सावध राहणे इष्ट ठरेल.

पण 'इस्सेभी ज्यादा' पायरी गाठली ती सदोबांनी. पार्लमेंटमध्ये आपण राष्ट्रीयीकरणाच्या बाजूनेच कौल देणार अशी एकीकडे ग्वाही देत असतानाच त्यांनी

येथल्या रोटरी क्लबमध्ये केलेल्या भाषणात राष्ट्रीयीकरणावर टीकेची झोड उठविली आणि 'बये लोकशाही, सांभाळ, वैऱ्याची रात्र आहे,' असा जाहीर इशारा दिला. अर्थात् बाईंच्या नाकाला चांगल्याच मिरच्या झोंबल्या आहेत. निजलिंगप्पांनी त्यांना 'आता आपण समेटाच्या वाटाघाटी करू या' म्हणून नुकतेच लेखी आमंत्रण दिले त्याच्या लेखी उत्तरात बाईंनी तक्रार केलीं की सदोबांचे हे अचकट विचकट बोलणे म्हणजे समेटाच्या वाटाघाटींना अपशकुनच नाही का? आपल्याला पदच्युत करण्याचे कारस्थान पक्षात शिजत आहे, असा इंदिराजींना हल्ली सारखा संशय येत असतो त्याबद्दलही 'अप्पां'शी गप्पा होणार आहेत. पण येत्या दहा–बारा दिवसांत ही गाजलेली मुलाखत झाली तरी राष्ट्रपतिपदाची चुरस संपल्याशिवाय 'वादेवारे तत्त्वबोधे' होण्याची शक्यता वाटत नाही.

—अनामिक

## दिल्ली : दिनांक २९ जुलै

'रघुनाथे रक्षिले ब्रीद' असे राजधानीत राजकीय विवाद प्रसंगी प्रत्यही अनुभवाला येत असते. गेल्या दोन सप्ताहापासून जी नाजूक राजकीय परिस्थिती आकार घेत आहे त्यात मात्र हा अनुभव जरा निराळ्या अर्थाने येत आहे. या वेळीचा 'रघुनाथ' बदलला आहे. विवाद निर्माण झाला, की 'मध्यस्थ' म्हणून (राजकीय ब्रोकर म्हणा वाटल्यास) श्री. र. के. खाडिलकर पुढे सरसावलेले दिसत असत. जुन्या जमान्यापासून कै. खासदार फिरोझ गांधी (वर्तमान पंतप्रधानांचे पति) यांचे स्नेही म्हणून हे 'रघुनाथ' विवादाच्या वावटळीत दुय्यम 'मध्यस्थ' म्हणून ओढले जात असत. दुय्यम म्हणण्याचे कारण 'प्रथम' स्थान स्वाभाविकपणे श्री. फिरोझ गांधी यांच्याकडेच जात असे. या वेळी मात्र ही 'रघुनाथ' भमिका श्री. रघुनाथ रेड्डी या अबोल मंत्र्याकडे चालून आलेली आहे. सकृत् दर्शनी हे खरे वाटू नये, अशी वस्तुस्थिती आहे. परंतु, हा 'अबोल' वाटणारा व 'निष्पाप' दिसणारा राज्यमंत्री (मिनिस्टर ऑफ् स्टेट) दिसतो तसा मात्र नाही. हे गृहस्थ चांगल्यापैकी लेखन करणारे असून साम्यवादाला 'समाजवादी' गोंडस स्वरूप देण्यांत पटाईत असल्याने पंतप्रधान श्रीमती इंदिराजींच्या अगदी आंतल्या गोटातील, विश्वासातील, व्यक्ती (किचन कॅबिनेटच्या सदस्यांपेक्षा काकणभर

[ पृष्ठ ४६ वर ]

# युवक क्रांति दल

## डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे

दिनांक ११ जुलैपासून पुण्यात फीवाढ विरोधी आंदोलन सुरू झाले आहे आणि आता ते अधिक उग्र रूप घेईल, अशा वार्ता येत आहेत. हे आंदोलन ज्या निरनिराळ्या विद्यार्थिसंघटनांतर्फे चालू आहे, त्यांत 'युवक क्रांती दल' ही एक संघटना आहे. या संघटनेशी माझा प्रारंभापासून जवळचा संबंध असल्यामुळे माझी या आंदोलनास संमती आहे काय त्या वेळी विद्यार्थ्यांनी जे वर्तन केले ते मला पसंत आहे काय, युक्रांदचे ध्येयधोरण व सध्याचे आंदोलन यांचा कितपत मेळ बसतो, अशा तऱ्हेचे प्रश्न मला अनेकांनी विचारले. या वेळी आंदोलन ओसरत आले होते; पण आता ते पुन्हा अधिक उग्र रूपाने चालवावयाचे, असा कृति-समितीचा निश्चय जाहीर झाला आहे. तेव्हा यासबंधी थोडा खुलासा करणे अगत्याचे वाटल्यावरून हे निवेदन मी करीत आहे.

आंदोलन ११ जुलै रोजी सुरू झाले. त्या आधी चार दिवस मी युक्रांदच्या कार्यवाहांना एक पत्र लिहिले होते. ते प्रथम देतो व मग थोडा खुलासा करतो.

डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे ६९० बुधवार, पुणे २
७ जुलै १९६९

श्री. कार्यवाह, युवक क्रांति दल, पुण, यांस,
स. न. वि. वि.

गेल्या महिन्याभरात युक्रांदच्या कामाबद्दल मी माझे विचार स्पष्टपणे मांडले आहेत. मूळ उद्दिष्टाप्रमाणे युक्रांद सध्या कसलेच काम करीत नाही. तेव्हा तिच्या नियामक मंडळावर राहण्यात मला काही अर्थ वाटत नाही. तेव्हा माझे नाव मंडळा-वरून कमी करावे.

तुम्ही व तुमचे सहकारी सध्या ज्या मार्गाने जात आहात तो मला मुळीच पसंत नाही. तुमचा वेळ व शक्ती तुम्हो अनाठायी खर्च करीत आहात, असे मला वाटते. अशा स्थितीत मो नियामक मंडळावर राहण्यात काय हशील ?

कच्छच्या मोर्चापासून मी तुम्हा सर्वांना हे सांगत आहे. मला कोणत्याही संस्थेशी औपचारिकरीत्या निगडित राहावे असे वाटत नाही. माझे अनेक वर्षांचे ते धोरण आहे. त्यातून मला नापसंत गोष्टी चालतात तेव्हा ही गोष्ट फारच जाणवते. मी खरे नियमन केले तर तुम्हांला जाच ! न केले तर 'नियामक' या शब्दाची चेष्टा ! तेव्हा आपले नाव काढून घेणे हे योग्य. म्हणून ते मंडळावर ठेवू नये, ही विनंती.

श्री. दत्ता कुलकर्णी यांच्याजवळ मी सर्व खुलासा केला आहे. खेड्यात जाऊन वैचारिक क्रांती करणे हे संस्थेचे खरे उद्दिष्ट ! त्या दृष्टीने गेल्या तीन-चार वर्षांत

एकही पाऊल पुढे पडलेले नाही व पुढे कधी पडेल, असा रंग दिसत नाही. त्यामुळे मला युक्रांद संस्थेत कसलाही रस राहिला नाही. म्हणून नियामक मंडळावरून माझे नाव कमी करावे. क. लो. हे वि.... —सही

यावरून असे दिसून येईल की, युक्रांदच्या नियामक मंडळावर असावे, असे केव्हाच माझ्या मनात नव्हते; पण हे विद्यार्थी एक-दोन खेड्यांत जाऊन काही काम करीत आहेत, इतरही बरेच विधायक कार्य करीत आहेत, असे दिसल्यावरून नियामक मंडळावर राहण्याने फारसे बिघडत नाही, असे वाटल्यामुळे मी तेथे राहिलो. शिवाय युक्रांदची सरकारी दप्तरात रीतसर नोंद झालेली नाही. नियमन, मार्गदर्शन हे सर्व अनौपचारिकपणे, खाजगी चर्चेतून होत होते आणि कार्याचे स्वरूप चळवळीचे नसून विधायक सेवेचे होते, म्हणून नाव काढून टाकण्याचा मी आग्रह धरला नाही.

पण कच्छच्या मोर्चापासून कामाचे रूप पालटते आहे, असे मला वाटू लागले. शिवाय युक्रांदच्या काही प्रमुख कार्यकर्त्यांचे लेखन कोठे कोठे प्रसिद्ध होऊ लागले. ते युक्रांदच्या उद्दिष्टाला फारच घातक होते व आहे. त्या कार्यकर्त्यांच्या भाषणांचे वृत्तांत एक-दोनदा प्रसिद्ध झाले, ते वाचूनही मनाला जरा अस्वस्थ वाटले म्हणून तेव्हापासून मी त्यांना माझी नापसंती स्पष्ट शब्दांत सांगू लागलो. पण मुख्य गोष्ट अशी स्पष्ट होऊ लागली की, राष्ट्रनिष्ठा, लोकशाही, समाजवाद सामाजिक समता, धर्मसुधारणा, व्यक्तिस्वातंत्र्य, लोकांचे हक्क, लोकांची कर्तव्ये, वैज्ञानिक दृष्टिकोण यांचा अभ्यास करणे व ते विचार मिशनरी पद्धतीने ग्रामीण जनतेत प्रसृत करणें हे जे मुख्य उद्दिष्ट, त्याकडे या युवकांचे असावे तसे लक्ष नाही. यासाठी त्यांनी सर्वस्व वेचावे, ही माझी कल्पना व फारसे काही करू नये, ही त्यांची वृत्ती. अशा स्थितीत फी-वाढ आंदोलनात भाग घ्यावयाचा व आपली शक्ती त्या कामी खर्च करावयाची, असे त्यांनी ठरविले. तेव्हा मग. मला युक्रांद या संस्थेत कसलाही रस राहिला नाही. आणि मी कार्यवाहांना तसे कळवून टाकले.

युक्रांदच्या नियामक मंडळात मी, प्रा. गं. बा. सरदार, प्रा. रा. म. बापट, मळवलीचे श्री. काकासाहेब चिचलीकर, असे पुणे भागातले चौघे व प्राचार्य मे. पु. रेगे, डॉ. राणे आणि आबासाहेब करमरकर असे मुंबई भागातले तिघे, असे सात सभासद होतो. माझे पत्र गेल्यावर प्रा. बापट व श्री. चिचलीकर यांनी शनिवार ता. १९ रोजी युक्रांदच्या कार्यकर्त्यांशी चर्चा केली. त्या चर्चेवरून सर्व नियामक मंडळाचेच विसर्जन करावे, असा प्रा. बापट व श्री. चिचलीकर यांनी विचार केला. रविवारी २० तारखेस त्यांनी मला तो सांगितला व त्या दिवशी इतर सभासदांशी चर्चा करून प्रा. बापटांनी त्यांचीही संमती मिळविली. रविवार ता. २७ रोजी प्रा. बापट यांनी नियामक मंडळ विसर्जित करण्यास सर्व सभासदांची मान्यता मिळाली आहे, तेव्हा २० तारखेपासूनच मंडळ विसर्जित झाले असे समजा, असे मला घरी येऊन सांगितले. तेव्हा त्यांच्या आधारे तसे गृहीत धरून, मी हे निवेदन प्रसिद्धीस देत आहे. —२९ जुलै ६९



# कै. छोटूबुवा गोखले

## एका रंगेल आणि कलासक्त जीवनाचे मनोज्ञ दर्शन

**कै. विष्णू वामन ऊर्फ छोटूबुवा गोखले ह्यांचे निधन २२ ऑगस्ट १९६८ रोजी झाले. त्यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त हा परिचय.**

**बाबा मुंबई**

कलाकार हा रसिक जनांच्या नजरेसमोर सदोदित असतो. त्याचे संगीत कानांत रेंगाळत राहते, शिल्प त्याची आठवण घेऊन उभे असते, तर नृत्याचा पदन्यास नृत्यकाराची याद दीर्घकाळ टिकवून ठेवतो.

परंतु कलाकाराची घडण करणारा, त्याला प्रसिद्धीच्या झगमगाटात आणणारा मात्र सदैव अंधारातच राहतो.

अशाच मूर्ती घडविणाऱ्या कलाकाराकरिता काया–वाचा–मने जीव कुर्बान करणाऱ्या, पण सदैव पडद्यामागे राहणाऱ्या एका रसिकराजाची ही ओळख !

ह्याचे खरे नाव विष्णू वामन गोखले, संगीत क्षेत्रात ज्याला उभ्या महाराष्ट्रातील संगीतप्रेमी लोक 'छोटूबुवा' ह्या नावाने ओळखतात तो हा. ज्याच्या निधनाने 'आता आम्ही पोरके झालो. आमचं माहेर गेलं,' अशा शब्दांत दुःख व्यक्त केले, त्या कलाकाराचे आश्रयस्थान हाच.

दादरच्या रानडे रोडवर 'मेहेता इस्टेट' म्हणून जी प्रचंड इमारत उभी आहे, तिच्या पहिल्या मजल्याचा निम्म्याहून अधिक भाग व्यापला आहे, 'न्यू श्रीकृष्ण बोर्डिंग हाऊस' ह्या अतिथिगृहाने. छोटूबुवांच्या मालकीच्या ह्या अतिथिगृहात सदैव वर्दळ असते ती महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून येणाऱ्या सर्व प्रकारच्या कलाकारांची.

नाटक—सिनेमांतील नटनटी, नाटककार, कवी, नामांकित गवय्ये, बजवय्ये यांची एकच गर्दी येथे आजही पाहावयास मिळेल.

जिना चढून आत पाऊल टाकलेत, की आपले स्वागत होई तेच ' धा ती धागेन। धा तिर किट। ' ह्या तबल्याच्या कायद्याने. उजव्या हाताला दर्शनीच असलेल्या बंद खोलीतून तबल्याचा आवाज ऐकू आला, की समजावे मालक आहेत ! नाहीतर पांढऱ्या शुभ्र धोतराचा काचा मारलेले, परीटघडीचा रेशमी शर्ट, रेशमी अथवा ब्यूसर्जचा कोट घातलेले, डोक्यावर काळी घडीची टोपी किंचित तिरकी घातलेले, हातात सदैव छत्री बाळगणारे, मध्यम उंचीचे व मध्यम बांध्याचे, आपल्या अधू डोळ्यांवरील जाड चष्म्यातून बघणाऱ्याच्या डोळ्याला डोळा भिडवून आपली जुजबी विचारपूस करून चटकन आत किंवा बाहेर निघून जाणारे तेच हे छोटूबुवा त्या अतिथिगृहाचे मालक समजावे.

प्रथमदर्शनी आपल्या किंचित तुटक वागण्याने आपल्याविषयी प्रतिकूल मत करून घेणारे ' मालक ' एकदा का त्यांची—आपली पट्टी सापडली की अल्पावधीतच आपले कायमचे मित्र, हितचिंतक बनतील हे त्या वेळी आपल्याला सांगूनही खरे वाटत नाही.

छोटूबुवांचे शालेय शिक्षण जेमतेम ४ इयत्तेपर्यंतच; पण शेतकी शिक्षण मात्र आजच्या कोणत्याही शेतकी तज्ज्ञाच्या तोडीचे ! त्या काळी जांभूळ (बदलापूरजवळ) शेतकी शाळेचा हुशार विद्यार्थी म्हणून त्यांनी नाव कमावले होते. जेथे जे पीक निघण्याचा सुतराम संभव नाही, तेथे त्यांनी तेच पीक बारेमाप काढून दाखविले आणि तज्ज्ञांनाही चकीत करून सोडले. त्या काळात शेतीला लागणारी खते आजच्या इतक्या सुलभतेने उपलब्ध नव्हती; किंबहुना, खतविषयक शास्त्र अभावानेच होते, ही गोष्ट मुद्दाम लक्षात ठेवण्यासारखी आहे.

एखादी गोष्ट अशक्य असे कोणी म्हटले की, ती शक्य करून दाखवावयाची हा छोटूबुवांच्या स्वभावाचा स्थायीभावच होता. मग जिद्दीने त्याकरिता पडतील ते श्रम करण्याची त्यांची सदैव तयारी असे. म्हणूनच सरकारी शेतकी खात्याची नोकरी तडकाफडकी सोडून त्यांची दृष्टी मोटरच्या धंद्याकडे वळली. ' तुला जन्मात मोटर चालविता येणार नाही, ' अशी दर्पोक्ती करणाऱ्या आप्ताच्या घशात त्याचेच शब्द परत घातल्याचा किस्सा सांगण्यासारखा आहे. मेव्हण्याच्या मदतीने मोटर ड्रायव्हिंग शिकून दोन-चार महिने उलटले असतील नसतील, तोच त्यांनी भिवंडीहून एक जंगी ट्रक माल भरून पालघर येथे आणला आणि ज्याचा माल त्याला सुपूर्त करून रिकामा ट्रक त्या आप्ताच्या घरामागे एका चिंचोळ्या बोळकंडीतून आणून उभा केला आणि त्याला सांगितले, " मी ट्रक येथे आणून उभा केला आहे. तुम्ही आयुष्यभर मोटर चालविता तर आता हा ट्रक मागेपुढे न करता बाहेर रस्त्यावर काढून दाखवा ! "

त्यांनी टॅक्सीचा धंदा केला तोही अशाच रंगेलपणाने. त्या काळात सरदारगृह हे खरेखुरे महाराष्ट्रातील सरदारांचे माहेरघर होते. त्याचे मालक कै. बाबूराव साळवेकर ह्यांच्या आश्रयाने छोटूबुवांनी तेथेच आपला धंदा सुरू केला व थोड्याच दिवसांत चांगला जम बसविला. त्या निमित्ताने सांगली, मिरज, मुधोळ, जत, जमखिंडी आदी ठिकाणच्या बहुतेक संस्थानिकांशी त्यांची जवळीक झाली. घरोब्याचे, मित्रत्वाचे नाते जमले. संस्थानी इतमामाला शोभेल अशी दुसरी एक गाडी घेतली लाल मर्सिडिझ. सीटवर काश्मिरी गालिचे घातलेली ! ती गाडी पाहूनच सामान्य माणसाची काय शामत ती थांबवविण्याची ! सामान्यांकरिता ती नव्हतीच. तिच्यात बसण्याचा मान फक्त बड्या पाहुण्यांचा. तिच्या मीटरवर सदैव बुरखा असे 'एंगेज्ड'चा. मुंबईच्या टॅक्सीच्या इतिहासात काश्मिरी गालिचे पांघरून फिरणारी लाल मर्सिडिझ बहुधा दुसरी आढळणार नाही. अशी ऐट तिची आणि तिच्या मालकाची !

पण छोटूबुवा फार काळ ह्या धंद्यात रमले नाहीत. १९३५ च्या कायद्याने संस्थानी राजकारणावरही सावट पडले. संस्थानी विलिनीकरणही काळ्या दगडावरची रेघ समजून संस्थानिक आपआपले कारभार आटोपते घेऊ लागले. सी. सी. आय. सारखी दुसरी हॉटेले उभी राहिली. त्यामुळे संस्थानिकांची सरदारगृहाकडील वर्दळ हळू हळू कमी होऊ लागली. अशा परिस्थितीत पूर्वीचा शाही थाट कसा टिकणार ? मुंबईचा सामान्य टॅक्सीवाला म्हणून धंदा करणे छोटूबुवांसारख्या जिद्दी माणसाला कल्पनेनेही मान्य होणे शक्य नव्हते. त्यांनी सरळ सरळ गाड्या विकून टाकल्या आणि धंदा बंद केला.

सन १९३८. हिटलरच्या गर्जनांनी जगाला भयभीत केले होते. युद्धाला केव्हा तोंड फुटेल ह्याचा नेम नव्हता. पुढे कोणता धंदा करावा ह्या विचारात काही महिने निघून गेले आणि एक दिवस धंदा आपल्या पायांनी चालत आला !

दुसरे महायुद्ध सुरू झाले होते. मुंबईत 'ब्लॅक आऊट'चे राज्य होते. बायकामुलांची मुंबईहून रवानगी होत होती. वातावरण भीतीचे व अनिश्चित होते. अशा परिस्थितीत, त्या काळी हॉटेलच्या धंद्यात नावलौकिक मिळविलेल्या कै. आबा जोशी ह्यांनी एक बोर्डिंग हाऊस छोटूबुवांना विकून टाकले. तेच आजचे 'न्यू श्रीकृष्ण बोर्डिंग हाऊस.' हॉटेलच्या धंद्याची काडीमात्र माहिती नसताना अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत छोटूबुवांनी त्याचा कायापालट केला. त्याला छोट्या जागेतून उचलून आजच्या प्रशस्त जागेत नेले. पाहिजे तसे फेरफार करून त्याला सर्व सुखसोयींनी नटविले. तेथेच ते आज ३० वर्षे आपली लोकप्रियता व वैशिष्ट्यपूर्ण स्थान टिकवून राहिले आहे.

## तबल्याचा रियाज

आणि येथेच गेली ३० वर्षे संगीत फुलत आले, बहरत आले. नाट्य निर्माण झाले. 'तिरकिट धा। धा तिरकिट।' कायदा, पेशकार, बोल, तुकडे मध्यरात्र

उलटून गेली तरी आसमंत व्यापून राहिल. छोटूबुवांच्या अंगचा कलाकार जागा झाला तो ह्या काळातच. तबल्याच्या रियाजाला खरी सुरुवात झाली ती ह्या वेळीच ! तसा तबल्याचा त्यांचा नाद जुनाच. त्यांनी कै. बाबूराव गोखले ह्यांच्या 'महाराष्ट्र संगीत विद्यालया'त शिक्षण घेतले, पण तो जुजबी छंद म्हणून. सरदार-गृहात असताना मधून मधून आर्टिस्ट गोंधळेकर (नंतर जे. जे स्कूलचे डीन) ह्यांच्या फ्ल्यूटबरोबर तबल्याची साथ असावयाची छोटूबुवांची आणि ऐकणारे श्रोते असावयाचे हैदराबादचे श्रीमंत सरदार राजे राय राजन ! पण आता जिद्दीने रियाज सुरू झाला. खाँसाहेब नन्ने खाँसाहेबांसारख्या निष्णात गुरूकडून काही वर्षे तालीम घेतल्यावर त्यांच्या पश्चात त्यांनी खाँसाहेब गामेखाँ साहेबांचा गंडा बांधला. घनघोर तपश्चर्या, एकच ध्यास, एकच लक्ष. खाँसाहेब सकाळी ९ वाजता हजर होत, ते दुपारी २–२।। पर्यंत. गुरुशिष्यांना समच सापडत नसे. दुपारनंतर खाँ-साहेब गेले तरी रियाज चालूच. संध्याकाळी गायकवादक मंडळी जमली म्हणजे काय खंड पडेल तेवढाच. रात्री पुन्हा 'तिरकिट । धा तिरकिट' सुरू होई ते मध्यरात्र उलटेपर्यंत. खाँसाहेब शमसुद्दीन खाँही तालीम देत. रेडिओची ड्यूटी करून रात्री उशीरा खाँ अल्लारखाँ येत तेच एखादा तुकडा गुणगुणत. महमद अहमद, खाँ-साहेबांचे चिरंजीव इनामअल्ली, रिजराज, श्री. नारायणराव इदूरकर वगैरे तबलिये अधूनमधून येत. पूरब बाज, दिल्लीबाज, अजराडा वगैरे घराणी एकत्र जमली की कायदे, रेले, गततोडे, परण, पेशकार आदी तबल्याच्या विविध अंशांनी नटलेला दरबार उभा राही. दिवसांमागून दिवस आणि रात्रींमागून रात्री उलटत होत्या. अशी किती वर्षे गेली कोण जाणे ! छोटूबुवा एक पट्टीचे तबलावादक म्हणून त्यांचा बोलबाला होऊ लागला. रेडिओचे तेव्हाचे अधिकारी बुखारीसाहेबांनी तर त्यांची एक मुलाखतच रेकॉर्ड करून घेतली आणि बुद्धी चालविल्यास तबल्याचे गणित किती प्रगल्भ अवस्थेला पोहोचू शकते, ह्याची खात्री करून घेतली.

एवढी प्रगती केल्यावर छोटूबुवा एक प्रख्यात तबलावादक म्हणून मान्य व्हाव-यास पाहिजे होते; पण त्यांचे ग्रहच असे की संपूर्ण यश त्यांच्या पदरी कधीच पडावयाचे नाही. खाँसाहेब गामेखाँ वारले आणि त्यांचा रियाज सुटला, तो अगदी अलीकडेपर्यंत. त्यानतर गेल्या ३।४ वर्षांत त्यांना कोणी रियाज करताना पाहिले असते तर त्यांना एक चमत्कार दृष्टीस पडला असता. प्रखर मेहनतीने ज्याचा 'हात' इतका 'निघाला' होता त्याचाच हात आता कोणीतरी हातोहात काढून घेतला होता. ' आणि नव्याने ओळख करून घेणाऱ्या विद्यार्थ्यासारखा तो कोरा करकरीत झाला होता. दिलेली विद्या इतक्या सुलभतेने पुन्हा परत घेता येते, हे सांगूनही खरे वाटणार नाही. पण छोटूबुवांच्या बाबतीत हे घडले. हे सत्य आहे, अनाकलनीय आहे.


[ पृष्ठ ३६ वर ]

# साद । सेतू

मँगो-व्हॅली रेस्टॉरंट. अस्सल बंगाली वातावरण. काऊंटरपासच्या एका टेबलावर मी बसलो आहे. सकाळचे सात वाजले आहेत. टेबलावरचा चहा गारढोण झाला आहे. अॅशट्रेवर ठेवलेली सिगारेट तशीच जळत आहे. माझे कोणीकडेच लक्ष नाही. मी वाचत आहे.

गोड गोड भावगीते किंवा अशाच एका आकाराचे आठ पानी पँफलेट. न्यूज प्रिंटवर छापलेले. लेखकाचे नाव कमल मुजुमदार. प्रिंटर्स लाईन वगैरे आहे, त्यावरून पत्ता लागतो.

मी चहा–सिगारेट तशीच टाकून उठतो (बिल मात्र देतो ! )आणि एस्प्लनेडला



## लेखांक : सात | आठ
## चं द्र शे ख र

जाणारी ट्रॅम पकडतो. कलकत्ता शहर हळूहळू जागे होत आहे. काळेकुट्ट आणि गोरे धप्प बंगाली बाबू शुभ्र धोतराचा सोगा हातात पकडून भराभर चालले आहेत. दमचकवाले धापा टाकू लागले आहेत. सकाळच्या प्रहरीही त्यांच्या कपाळावरून घामाचे लोट वाहत आहेत.

कलकत्त्याच्या रस्त्यांवरील अनेक परस्परविरोधी दृश्ये न्याहाळीत मी मघाशी वाचलेल्या मजकुराचा विचार करीत आहे. कमल मुजुमदार कसा असेल याचा अंदाज करीत आहे.

एस्प्लनेडला उतरून टॅक्सी करतो — महात्मा गांधी रोड. तिथून दमचक करतो आणि घरनंबर न्याहाळीत वाट कापू लागतो. कलकत्त्याचे हे एक बरे आहे. रस्ता, घरनंबर व शहरविभाग नंबर तेथे अत्यंत ठळकपणे लिहिलेले आहेत. कलकत्त्यातील कोणाही प्राणीमात्राशी न बोलता नवखा माणूस येथे हव्या त्या ठिकाणी जाऊ शकतो.

मला ४४ अ महात्मा गांधी रोड हा पत्ता हवा आहे. एक–दोन बिल्डिंगमध्ये टल्ले खाल्ल्यावर मला माझी मंझिल भेटते. या वेळपर्यंत दहा वाजले आहेत. दोन कोकाकोला पोटात गले आहेत. घामाचे लोट पुसत मी टेंटेटिव्हली जिना चढतो.

इमारत अगदी बकाल आहे. पहिल्या बिल्डिंगवर एका अनामिकाला कमलबाबू कोठे राहतात ते विचारतो. तो दुसऱ्या मजल्याकडे बोट दाखवतो.

कमलबाबूंच्या खोलीच्या दारात मी घुटमळतो. प्रिंटर्स लाईनवरून मला असे वाटले होते की, काही छापखाना असेल, ऑफिस असेल. पण ही तर एखाद्या लॉज-मधली खोली दिसत आहे. अस्ताव्यस्त–थोडीफार कळकट–कुबट !

कॉटवर पन्नाशीचा एक फाटका प्राणी बसला आहे. अंगात बावाजी धोतर, सोगा खांद्यावर ! विस्तीर्ण कपाळ, काळे-पांढरे–विरळ विस्कटलेले केस, छातीवर पांढरे केस. लहानखुरी शरीरयष्टी. त्याला साजेसा इतर अवतार !

या साऱ्यांशी विसंगत आहेत ते त्याचे डोळे ! कपाळाच्या थोडे आत विलक्षण चमकदार, बोलके, संत्रस्त, सावध, कावेबाज, तुच्छतेची उधळण करणारे — या प्राण्याचे मर्म त्याच्या नजरेत आहे.

स्टलावर ठेवलेल्या ताटातून हे सदगृहस्थ बकाणे मारीत आहेत. त्यांचे माझ्या-कडे लक्ष जाते. ते किंचित हसतात.

आता त्यांचा चेहरा पूर्णपणे वेगळा आहे. नजरही आश्चर्यकारकपणे सौम्य, आवाहक आणि मानवी झाली आहे. पाण्याचे भांडे तोंडाला लावीत ते हातानेच

'काय पाहिजे ' अशी खूण करतात.

"कमलबाबू मुजुमदार आपण ?" जरा धीर येऊन मी विचारतो.

"येस. बसा. आपलं नाव ?" ताटातच भडाभडा हात धुवत कमलबाबू बोलतात. आमचा संवाद इंग्रजीतून झाला. त्याचा मराठी तर्जुमा येणेप्रमाणे–

"आपलं हे पँपलेट वाचून मी आलो आहे."

"अच्छा. बसा बसा बसा. कसं काय वाटलं तुम्हांला ?" कपडे बदलण्याच्या तयारीला लागत कमलबाबू विचारतात.

"आपण कोठे बाहेर चाललात ?"

"हो. ऑफिसला. पाच–दहा मिनिटं वेळ आहे तसा. बोला."

"या पँपलेटचे पुढचे भाग मला हवेत. माझा पत्ता टिपून घ्या. केव्हा निघतील ?"

"कान्ट से. माझा विचार पूर्ण झाला की निघतील केव्हातरी. तरी तुमचा पत्ता देऊन ठेवा."

"मी पैसे वगैरे देऊन जाऊ का ?" (पँपलेटवर वीस पैसे किंमत छापली आहे,)

"नॉन्सेन ! अहो, तुम्ही मला शोधत इथवर आलात आणि मी तुमच्याकडून पैसे घेऊ ?"

"बरं. चर्चेचं काय ?"

"या येत्या रविवारी."

"मी आज रात्रीच्या फ्लाईटने बाँबेला जात आहे. आज काही जमेल का ?"

"सॉरी. ऑफिस आहे ना !"

"तुमचं ऑफिस कोठे ?"

"राजभवनजवळ आहे. ट्रॅमने जातो."

"मग असं करू, आपण टॅक्सी करू. वाटेत चर्चा करू. हाऊ ?"

"सॉरी अगेन. मी टॅक्सीत बसत नाही."

"असो–तुमचं हे प्रचारकार्य कोण करतं ?"

"आहे एक छोटी संघटना. अगदी छोटी. आज पहिलेच निवेदन सादर केले आहे. बघू !" कमलबाबू आता मात्र अगदी निघतात. जाताना माझ्याशी तीनतीनदा हस्तांदोलन करतात. मी अपेक्षाभंग लपवीत त्यांचा निरोप घेतो. धाडधाड खाली येतो. टॅक्सी पकडून त्याला सिगारेट पेटवीत सांगतो– "लेक प्लेस्"

कमलबाबू व मी यांच्या मुलाखतीविषयी एवढे सविस्तर लिहिण्याचे तसेच खास कारण आहे ! कारण यापुढे प्रिय मराठी वाचक जो मजकूर वाचील तो अफलातून आहे. यात माझे काही नाही हा खुलासा मुद्दाम करतो.

कमलबाबूंच्या त्या महाअफलातून पँपलेटचे नाव आहे ' नॅशनल लिबरेशन स्ट्रगल अँड बेंगाल."

'माणूस'ला जो ऐवज मी हवाली करणार आहे त्यात ही चीज असणार नाही

यचा मला खेद होतो. या गोष्टीचे कारण यथावकाश जनतेला कळेलच !

हा मजकूर लिहितानाही ते पँपलेट माझ्याजवळ नाही. केवळ स्मरणशक्तीवर भरंवसा ठेवून मी थोडक्यात सारांश देत आहे.

भरतखंडात साम्राज्यवादाची परंपरा श्रीरामचंद्रांपासून चालत आली आहे. आर्य साम्राज्यवादाला तोंड देण्यासाठी झालेल्या प्रयत्नांचा भाग म्हणून बौद्ध धर्माचा उल्लेख करावा लागेल. इस्लाम धर्मीयांनीदेखील हा प्रयत्न थोडाफार केला. आपल्या साम्राज्यवादाला स्थैर्य आणण्यासाठी आर्यांनी प्रथम धर्माचा व नंतर राष्ट्रवादाचा उपयोग केला व भरतखंडातील विविध राष्ट्रे आपल्या जोखडाखाली ठेवली.

ब्रिटिश राजवटीनंतर पुन्हा लोकशाहीच्या नावाखाली भरतखंडावर आर्य साम्राज्यशाहीचे थैमान सुरू झाले आहे. तथाकथित राष्ट्रीय पातळीवरचा प्रत्येक राजकीय पक्ष—काँग्रेसपासून सी. पी. एम. पर्यंत—हा आर्य साम्राज्यवादाच्या हातातील अवजार आहे. या पक्षांना यापुढे राजकीय भवितव्य नाही.

कारण साधे आहे. भारत हे एक राष्ट्र नसून अनेक राष्ट्रांचे मिळून बनलेले ते खंड आहे. भारताला राष्ट्र मानणे ही भौगोलिक व सामाजिक घोडचूक आहे 'राष्ट्र' या शब्दाची व्याख्या व व्याप्ती पाश्चात्य साम्राज्यशाहीने आपल्या सोयीप्रमाणे ठरवली व आपण ती आंधळेपणाने स्वीकारली आहे. ही व्याख्या अनैतिहासिक असून काळाच्या कसोटीवर टिकणार नाही.

भरतखंडात निरनिराळ्या राष्ट्रांतील राष्ट्रवादी प्रेरणा आता जाग्या होत असून 'आर्यन साम्राज्यवादा'ला आव्हान देत आहेत. हे आव्हान खरेखुरे आहे. व भरत-खंडाच्या अंतिम कल्याणासाठी या राष्ट्रांना त्यांचे स्वतःचे व्यक्तित्व जोपासण्याची मोकळीक मिळाली पाहिजे.

वंग, मराठा, तामीळनाडू, गुर्जर, वगैरे राष्ट्रे लौकरच निर्माण होतील व भरत-खंड हे खऱ्या अर्थाने आपले भौगोलिक स्वत्त्व प्रस्थापित करू शकेल.

ही प्रक्रिया यशस्वी होण्याचा मार्ग एकच आणि तो म्हणजे मार्क्सवाद ! आपल्या गरजांप्रमाणे प्रत्येक भारतीय राष्ट्र मार्क्सवादाचा अर्थ लावून आपली घडी बसवील व मग दुसऱ्या भारतीय राष्ट्रांशी ध्येयवादात्मक समरसतेच्या पातळी-वर सहकार्य करील.

आज भारतीय राष्ट्रांची ही धडपड प्रारंभीच्या अवस्थेत आहे. तिची सार्वत्रिक अवहेलना होत आहे. भारतीय पातळीवरील 'आर्यन साम्राज्यवाद' या प्रेरणा दडपून टाकण्यासाठी अनेक पवित्रे टाकीत आहे. फार काय ? साम्यवादी देशांना-देखील या प्रक्रियेचे यथार्थ आकलन न झाल्याने ते चुकीची भूमिका घेत आहेत.

साम्यवादी चीन येथे भारतीय पातळीवरील साम्यवादी नेतृत्वास जवळ करीत असून भारतीय राष्ट्रांच्या झगड्याला तुच्छ लेखीत आहे—ही भूमिका निखालस चूक आहे. पीकिंगला इतिहासाचे धडे पुन्हा शिकावे लागतील !

इतर भारतीय राष्ट्रांपेक्षा बंगालची समस्या आणखी कठीण आहे. ब्रिटिशांच्याकडून सत्ता घेण्यास हपापलेली 'आर्यन साम्राज्यशाही' इतकी जनताविमुख होती की, तिने बंगालच्या फाळणीस मान्यता दिली; तेव्हा बंगालच्या राष्ट्रवादी झगड्याचे दोन टप्पे आहेत.

एक म्हणजे पूर्व बंगाल व पश्चिम बंगाल यांनी धर्मभेद विसरून एकत्र येणे व दुसरे म्हणजे 'आर्यन साम्राज्यवाद' झुगारून देऊन बंगाली राष्ट्राची प्रतिष्ठापना करणे. 'बंगाल' हे एक स्वतंत्र राष्ट्र आहे. त्याची फाळणी करण्याचा अधिकार कोणासही पोहोचत नाही. हे आव्हान सिद्ध करण्याची जबाबदारी प्रत्येक बंगाली व्यक्तीवर आहे. पूर्व बंगाल व पश्चिम बंगाल येथील जनतेने आपल्या धार्मिक मतभेदांना मूठमाती दिली पाहिजे, 'बंगाली' म्हणून एकजुटीने उभे राहिले पाहिजे व शास्त्रशुद्ध मार्क्सवादाच्या साहाय्याने 'स्वतंत्र बंगाल' जगाच्या नकाशावर आणला पाहिजे. हे काम करीत असताना बंगालने इतर भारतीय राष्ट्रांना त्यांच्या लढ्यात जरूर ती सर्व मदत केली पाहिजे.

मला फार खेद होतो की मूळ इंग्रजी तर्जुमा वा त्यातील महत्त्वाची वाक्ये उद्धृत करणे मला अशक्य आहे. विश्वास ठेवा – पुस्तकाच्या आकाराच्या त्या चार-सहा पानांत एक टाईमबाँबच लावून ठेवला गेला आहे.

मूळ भूमिकेविषयी काहीच मत व्यक्त न करता मी या विवेचनाच्या बौद्धिक दर्जाविषयी काही मते व्यक्त करू इच्छितो.

या विवेचनातील तर्कसंगती, मांडणी, भाषेची काटकसर, मुद्यांची हाताळणी आणि या साऱ्यांच्या जोडीला एक संयमी पण संतप्त अशा भावनाशीलतेचा एक स्रोत ह्या साऱ्या गोष्टी केवळ अजब आहेत. वर्षानुवर्षांचे चिंतन आणि परिशीलन या लिखाणाच्या मागे उभे आहे हे शब्दाशब्दाला जाणवते. राजकीय मीमांसा कशी करावी याचे हे विवेचन हे एक सर्वोत्कृष्ट उदाहरण आहे; मी सँगो-व्हॅलीमध्ये हे 'प्रकरण' वाचले आणि कलकत्त्यातील माझे दहा दिवस, त्यांतील धावपळ, भेटीगाठी, चेहरेमोहरे, चर्चा, वितंडवाद, सारेसारे माझ्या मनातून अंतर्धान पावले. कमलबाबूंच्या भेटीनंतर मी अधिकच चक्रावून गेलो. हा फाटका, दरिद्री, नोकरपेशा माणूस आणि एवढी वैचारिक ताकद त्याने कोठून मिळवली असेल !

राजकीय विवेचन व चर्चा मी काही कमी ऐकली वा वाचली नाही. भल्या मातबरांचे मार्क्सपासून मार्क्यूजपर्यंतचे विचार मला परिचित आहेत. पण कमलाबाबूंच्या विचारात जो हर्सनेस आहे तो मला इतरत्र फार अभावाने जाणवला. अगदी अंधुकपणे हा हर्सनेस लॉर्ड केन्सच्या काही विवेचनांत आढळतो.

कमलबाबूंच्या पक्षाचे नाव मला कळले नाही. कदाचित काही नसेल, म्हणून मीच या चळवळीचे नामाभिधान करून टाकले आहे – 'बंगला नक्षलवाद' असे या भूमिकेस म्हणतो. साम्यवाद, डावा साम्यवाद, नक्षलवाद आणि आता बंगला –

नक्षलवाद ! बंगालची राजकीय प्रकृती किती सोसाटचाची आहे हे इतर प्रांतांना कधीच कळणे शक्य नाही. तेथील राजकीय धाडसवादाच्या मानाने आपला लढाऊ महाराष्ट्र अगदी 'अल्लाची गाय' भासतो !

'बंगला नक्षलवाद' हे काय आहे? मार्क्सचे स्थानियीकरण करण्याचा तो एक प्रयत्न आहे. एका अर्थाने नक्षलवादापेक्षा ही भूमिका अधिक व्यवहार्य व मूळच्या लेनिनप्रणीत मार्क्सवादाशी सुसंगत आहे. साम्यवादाच्या अभ्यासकांना हे ठाऊक आहेच की, सोव्हिएट रशियात प्रारंभीच्या क्रांतिकालात असा वाद सुरू झाला होता की, सर्व जगभर क्रांतीची पूर्वतयारी होईपर्यंत थांबावयाचे, की रशियात क्रांतीची चूड पेटवावयाची. ट्रॉटस्की व लेनिन एवढ्या एका मुद्यावर एकमेकांचे विरोधक बनले व ट्रॉटस्की जागतिक साम्यवादी क्रांतीच्या पूर्वतयारी-साठी रशियाबाहेर पडला.

साम्यवादी चळवळीच्या दिशेने लेनिनप्रणीत दिग्दर्शनच आज सर्वमान्य आहे. स्थानिक स्वरूपावर मार्क्सवाद आणावा व अशा अनेक ठिकाणी साम्यवादी चळवळ प्रस्थापित करीत जगाचा नकाशा लाल करून सोडावा, ही साम्यवादाची आजवरची स्ट्रॅटेजी राहिली आहे. 'बंगला नक्षलवाद' हे लेनिनच्या सूत्राचेच अपत्य आहे. फरक एवढाच की भारतीय पातळीवर मार्क्सवादाचे स्थानियीकरण न करता 'बंगला नक्षलवाद' बंगालच्या पातळीवर करीत आहे.

याला एक वांशिक बाजू आहे. लेनिनने रशियाबाबत स्वीकारलेली भूमिका व्यवहार्य ठरली. कारण सोव्हिएट रशियात स्लाव्ह वंशाची बहुसंख्या होती. त्यामुळे सबंध रशियाचे रूपांतर साम्यवादी राष्ट्रात करणे सोपे गेले.

कमलबाबू म्हणतात, भरतखंडात असा कोणताही एक वंश बहुसंख्य नाही, त्यामुळे अल्पसंख्य अशा एखाद्या वंशाने राष्ट्रवाद, धर्म, राजकीय पक्ष यांचा आधार घेऊन इतर भारतीय राष्ट्रांवर कबजा करण्याचा प्रयत्न करणे हे निंद्य व असमंजस आहे. तो कदापि यशस्वी होणार नाही. 'बंगला नक्षलवादा'लाच दुसरे व्यापक नाव 'वांशिक राष्ट्रवाद' असे देता येईल. हे एकदा स्पष्ट झाले की मग कमल-बाबूंच्या विचारांतील ढिसाळपणाही स्पष्ट होतो.

एकाच वंशाच्या लोकांची दोन राष्ट्रे जगात आहेत. वंश एक म्हणून राष्ट्र एक असे दिसत नाही. खरोखर राष्ट्र ही चीज अगदी अतार्किक आहे. भाषा एक असली तरी राष्ट्रे दोन असू शकतात. धर्म एक असला तरी किंवा अन्य कोणताही समान धागा एक असला तरी त्यामुळे दोन राष्ट्रांचे एकीकरण होत नाही.

राष्ट्र या कल्पनेची उपपत्ती हा अभ्यासाचा स्वतंत्रच विषय आहे. फार खोलात न शिरता एवढे म्हणता येईल की, भौगोलिक सलगता व आर्थिक हितसंबंध यांवर राष्ट्र ही संकल्पना उभी राहू शकते.

या दोन कसोटयांवर 'बंगला राष्ट्रवादा'ची तपासणी करता कमलबाबूंचे

बरेच विवेचन अचूक आहे असे दिसून यते. पूर्व बंगालमधील मुसलमानी बंगाल व कलकत्त्यातील हिंदू बंगाली हे एकमेकांना अधिक जवळ आहेत. बंगाली संस्कृती ही धर्मभेदाच्याही वर जाऊन बंगाली मनाची जडणघडण करीत असते. धर्मभेद हा या संदर्भात एक आगांतुक घटक आहे.

कमलबाबूंचे तर मत असे की, इस्लामी धर्मांचा भारतात प्रसार अधिक झाला असता तर भारतीय राष्ट्रांचा उदय लौकर झाला असता.

बंगालीपणाच्या समान धाग्याबरोबर पूर्व व पश्चिम बंगाल यांना जोडणारा आणखी एक प्रबल धागा उत्पन्न होत आहे. साम्यवाद हा तो धागा. गेल्या फेब्रुवारीतील मध्यावधी निवडणुकांत साम्यवादी (सी. पी. एम्.) उमेदवारांना मते द्यावी असे आवाहन करणारी हजारो पत्रे पूर्व पाकिस्तानी मंडळींनी आपल्या बंगाली नातेवाईकांस पाठवली होती. मुस्लिम जनतेचा अनुनय हा सी. पी. एम. विजयाचा एक मोठा आधार आहे.

अधिक व्यापक अर्थाने इस्लाम व साम्यवाद ही दोन तत्त्वज्ञाने एकमेकांशी फार मिळतीजुळती आहेत असे म्हणता येईल.

दोन्ही पुस्तकवादी आहेत. दोन्ही लढाऊ आहेत. दोन्ही सोपी व सुटसुटीत आहेत. दोघांचेही उद्दिष्ट जागतिक परिवर्तन हे आहे. कोठल्याही राष्ट्रातील मुस्लिम प्रथम इस्लाम मानतो व नंतर त्या राष्ट्राची घटना. (मुस्लिम मित्रांनी अस्वस्थ होऊ नये. हे विधान राजकीय नाही तर एक शास्त्रीय सत्य म्हणून केले आहे!) साम्यवादी मंडळींचेही तसेच आहे.

दोघांचा पराभवही समान आहे. जागतिक संदर्भ असलेल्या या दोन प्रेरणांना ठिकठिकाणच्या चित्रविचित्र प्रेरणांशी एवढे जुळवून घ्यावे लागत आहे, की



त्यामुळे त्यांचे खरे स्वरूप नष्ट झाले आहे. झटपट यश संपादण्यासाठी हा पवित्रा उपयोगी पडला तरी कालांतराने स्थानिक प्रेरणांनी या दोन्ही प्रेरणांवर मात केली असे दिसून येईल.

इस्लाम हा साम्यवादी तत्त्वज्ञानाचा सर्वांत पहिला अवतार होय. इस्लाममध्ये आर्थिक प्रेरणांना म्हणावा तितका वाव नाही व इस्लामचा रॅलिंग पॉइंट आर्थिक नाही. त्यामुळे इस्लाम हे तत्त्वज्ञान केवळ भावनेच्या पातळीवर राहिले. साम्यवादाने भावनिक आणि बौद्धिक या दोन्ही पातळ्यांवर जागतिक परिवर्तनाचे स्वप्न जनतेपुढे तरळत ठेवले.

बंगाली 'एथॉस', (मराठी प्रतिशब्द सुचणे कठीण आहे!) इस्लाम व साम्यवाद यांच्या संमिश्रणातून पुढेमागे एखादे पूर्णपणे नवीन असे व्यापक तत्त्वज्ञान निर्माण होणे अशक्य नाही. पण 'बंगला नक्षलवाद' हे ते तत्त्वज्ञान नव्हे!

अर्थात कमलबाबूंची इतर पँपलेटे वाचल्याखेरीज काही विधान करण योग्य नव्हे!

बंगला नक्षलवादाला अनुयायी किती हे सांगणे अवघड आहे. पण सर्वसाधारण बंगाली मनाची ठेवण पाहता हे तत्त्वज्ञान कालांतराने लोकप्रिय होणे सहजशक्य आहे. प्रत्यक्षात हे तत्त्वज्ञान अमलात आणणे अर्थातच फार जटिल काम आहे.

मला मात्र व्यक्तिशः 'बंगला नक्षलवादी' प्रेरणेचे स्वागत करावेसे वाटते. ते अशासाठी की हे एकच तत्त्वज्ञान असे आहे की, आज चीनकडे डोळे लावून बसलेल्या नक्षलवादाला आव्हान देण्याची ताकद त्यात आहे.

त्याहून आश्वासक गोष्ट म्हणजे चीनवादी बंगाली मंडळी कलकत्त्यात भरपूर प्रमाणात असताना, वातावरण माओमय असताना, एक बंगाली बंडखोर उभा राहतो आणि माओचे तत्त्वज्ञान चुकीचे आहे म्हणून ठासून सांगतो. हे चांगले आहे, बंगाली मनाच्या जिवंतपणाची ही एक खूण आहे. 'नक्षलवाद' ही काळाची गरज होती. तसेच 'बंगला–नक्षलवादा'बद्दल म्हणता येईल. टिटोने रशियाबाबत जे केले, हो–चि–मिन्ह चीनबाबत जे करीत आहे ते कमलबाबू व त्यांचे अनुयायी चीनबाबत करीत आहेत. कोणत्याही चळवळीच्या वाटचालीत परंपरेपेक्षा पाखंडीपणाच अधिक उपकारक ठरत असतो.

माझे महाराष्ट्रातील बहुतेक विचारवंत मित्र वरील मजकूर वाचून अस्वस्थ होतील. हे सगळे निराळेच दिसते. या बंगाली मंडळींना काही मर्यादाच दिसत नाही आणि 'चंद्रशेखर' या साऱ्यांबद्दल शांतपणे बोलत आहे हे कसे! विश्वास ठेवा, मी तुमच्याइतकाच अस्वस्थ आहे आणि तुम्हीही अस्वस्थ व्हावे हीच माझी अपेक्षा आहे. आपल्या वैचारिक जीवनात फार स्वस्थपणा (आणि स्वस्तपणा!) आला आहे. अस्वस्थपणा हे विचाराचे दुसरे नाव आहे हे आम्ही विसरत चाललो आहोत. विचार ही इतर गोष्टींप्रमाणेच विक्रीची गोष्ट आहे, असे मानले जाऊ लागले आहे.

९ ऑगस्ट १९६९

प. बंगाल अतिरेकी वाटत असेल; पण वैचारिक क्षत्रात तेथील साधीसुधी, फाटकी मंडळी बेगुमानपणे निषिद्ध प्रदेशातही संचार करीत आहेत, ही गोष्ट नाकारता येणार नाही. याउलट आगरकरांच्या महाराष्ट्रात, ज्योतिबा फुल्यांच्या महाराष्ट्रात, विचार करणे या प्रक्रियेला मंडळी घाबरत आहेत. असे (मला) दिसते. येथील विचारप्रकटन अगदी बेताबेताने सारवासारवी करून व केळकरी बाण्याचे होत चालले आहे. जणू काही एखादा विचार व्यक्त झाला तर पृथ्वीची उलथापालथच होणार आहे!

बंगाली मनाला साम्यवादाची साद नाही, चीनवादाची साद नाही, त्याला साद आहे ती वैचारिक बंडखोरीची. हे लक्षात घेतले नाही तर 'साप साप' म्हणून भुई धोपटण्याचा प्रकार सुरूच राहील. माझे कलकत्त्याला नशीब फारच जोरावर होते. कमलबाबूंची ज्या दिवशी गाठ घेतली त्याच दिवशी दुपारी मी त्यांच्या विचारांची व्यवहार्यता पडताळू शकलो, एका मुस्लिम साम्यवादी कार्यकर्त्याकडून!

लेक प्लेसला सी. पी. एम. च्या पॉलिटब्यूरो ऑफिसात गेलो तेव्हा सकाळचे अकरा वाजले होते. कागदपत्रांनी ठिच्चून भरलेल्या टेबलाजवळ एका वृद्ध गृहस्थांची वाचन समाधी लागली होती. पांढरेफेक केस, नाकावर ओघळणारा चष्मा, तोंडाचे बोळके, एक मळका गंजीफ्राक आणि निळी पट्ट्यापट्ट्यांची लुंगी! बराच वेळ त्यांच्या एकाग्रतेचे निरीक्षण करीत मी उभा होतो. अखेरीस कंटाळून मी सिगारेट पेटवल्यावर त्यांचे माझेकडे लक्ष गेले. चष्मा रीतसर कपाळावर सरकावीत त्यांनी माझ्याकडे किलकिल्या नजरेने पाहिले आणि ते म्हणाले,

"येस? प्लीज बी सीटेड!"

"मला विमलताईंना भेटावयाचे आहे."

"विमल, हॅज गॉन टू बॉंबे."

"बी. टी.?"

"ही हॅज गॉन अॅब्रॉड."

"आनंद आहे!" मी मनात म्हटले आणि उठून उभा राहिलो.

"जाता का? बसाना. आपलं नाव?"

चंद्रशेखर जर्नालिस्ट 'वगैरे' सर्व रेकॉर्ड लावली.

"मी मुजावर रेहमान. पूर्व पाकिस्तानी कम्युनिस्ट कार्यकर्ता. ग्लॅड टू सी यू. व्हॉट कॅन आय डू फॉर यू?"

माझ्या निराश मनात एक ब्रेनवेव्ह लहरली. मी कमलबाबूंचे पॅंपलेट काढून रहेमान साहेबांना दिले आणि सांगितले 'वाचा.' त्यांनी ते पाहिले नव्हतेच!

चष्मा पुन्हा डोळ्यावर, वाचन सुरू. मी दरम्यानच्या काळात एका आंध्रप्रदेशी फुलटाईमरबरोबर दोस्ती केली व गप्पा मारीत बसलो.

अर्ध्या तासाने जनाब रहेमान माझ्याकडे पाहते झाले आणि त्यांनी अस्वस्थपणे

मानेवरून हात फिरवला.

" सो ?"

" याबाबत आपलं मत काय ?"

" कमलबाबू मूर्ख आहे. त्याला हे कळत नाही, की दोन बंगाल एकत्र झाले की हिंदू बंगाली नामशेष होतील. "

" पण कमलबाबू धर्मभेद मानीत नाही. तो केवळ ' बंगाली ' आहे. "

" असे म्हणणे फार सोपे आहे, चंद्रशेखर. वागणे फार कठीण आहे. मी तुला सगळेच सांगू शकणार नाही; पण हे लक्षात घे की, पूर्व बंगालमधून निर्वासित आले ते सगळे हिंदू होते ! ते ' बंगाली ' होते म्हणून त्यांना तेथे थारा मिळाला का ?"

" जनाब, साम्यवाद आणि इस्लाम यांचे कलम होऊ शकेल की नाही ?"

" मे बी. पण त्याने हिंदूचे हात कलम होणारच !"

" मग यात काही अर्थ नाही म्हणता ?" चिकाटीने मी विचारतो.

" अर्थ !" मुजावरसाहेबांनी एक खोल सुस्कारा सोडला. साठ वर्षांच्या अनुभवाने मानवाच्या मूर्खपणाबद्दल व्यक्त केलेली ती अगतिकता थेट आरपार भिडणारी होती. कपाळावर हात फिरवीत जनाब म्हणाले, " चंद्रशेखर, आपण कशातून अर्थ काढण्याचा प्रयत्न करू नये हे बरे ! वंशवादाच्या आधारावर बलिष्ठ होऊ पाहणारा साम्यवाद हा खरा साम्यवाद नव्हेच. साम्यवादाचे वैशिष्टय हे होते की त्यातील भेद हा परिवर्तनीय होता. आर्थिक पायावरील वर्गीकरण आणि वांशिक पायावरील वर्गीकरण यांत फरक आहे की नाही ? ' परिवर्तनीयता ' हे ज्या तत्त्वज्ञानाचे प्राणभूत वैशिष्टय, त्याने अपरिवर्तनीय व मूर्ख गोष्टींचा आधार घ्यावा हे केवढे दुर्दैव ?" (जनाब हे सारे हिंदी–उर्दूत बोलले. मी त्याचा ' भारतीय ' तर्जुमा दिला आहे ! )

कॉ. वेंकटरामनबरोबर रामदासला भेटण्यासाठी भर उन्हातून जाताना कॉ. मुजावर रहेमान यांचे शब्द आणि त्याहीपेक्षा त्यांची अस्वस्थ नजर माझा पाठलाग करीत होती.

माझी स्टोरी संपली ! केव्हातरी ती संपणारच होती ! ती वाचून वाचकांना काय लाभ झाला हे मला कळणार नाही कदाचित. पण मला मात्र फार लाभ झाला हे निश्चित्त ! कोठल्याही स्टोरीचे मोराल सांगावे असा प्रघात आहे. मी माझ्याकडून प्रयत्न करणार आहे.

बंगाल आणि भारत यांत जी दरी आज दिसते ती भरून येणार की नाही ? कशी येणार ! हा सेतू कोण बांधणार ? मोठी करंटेपणाची गोष्ट आहे की ज्या भूमीत सागरावर सेतू बांधण्याचा पराक्रम झाला त्या भूमीत आज एका यकश्चित सरोवरावर सेतू कसा बांधावा, याची चिंता वाटत आहे. आपला प्रवास राष्ट्र

म्हणून, मानवसमूह म्हणून कोठे चालला आहे, याचे हे द्योतक आहे.

माझे असे म्हणणे आहे की, बंगाल आणि उर्वरित भारत यांच्यात सामरस्य व्हावयाचे असेल तर अन्य भारताने बदलले पाहिजे. कारण बंगाल मूळ भारताशी अधिक इमानी राहिला आहे.

ही बंडखोरांची भूमी आहे. या भूमीच्या धर्मात, हिंदु तत्त्वज्ञानात बंडखोरीचा उच्चांक आहे. बंडखोरीला वाव देण्याचाही उच्चांक आहे, हे विसरून अनेक वादांची पुटे चढल्याने, अनेक आक्रमणांची वलये चढल्याने उर्वरित भारत आज एका सांप्रदायिक व झापड लावलेल्या मनःस्थितीत आहे. बंगालचे वैशिष्ट्य हे की प्रत्येक आक्रमणाला सर्वप्रथम बळी पडूनही (की त्यामुळेच !) त्याने आपला बंडखोर बाणा शाबूत राखला.

जेथे गांधींना आव्हान देणारे निघाले तेथेच स्टॅलिनला आव्हान देणारेही निघाले. तेथेच आज माओला आव्हान देणारे निघत आहेत. हे समजून घेतले पाहिजे. त्याखेरीज बंगाल व उर्वरित भारत यांचा दुवा पुन्हा जमणे जरा कठीण आहे. हा सेतू बांधला पाहिजे हे निर्विवाद ! त्यासाठी अंधश्रद्धा आणि त्याहून अंध राजकीयवाद यांचे दगड फोडावे लागतील.

प्रस्थापित हितसंबंधांच्या रूपाने आड येणाऱ्या पाण्याच्या सळसळत्या प्रवाहाला तोंड द्यावे लागेल आणि एखादा बळीसुद्धा द्यावा लागेल.

—— मात्र याची चिंता अन्य भारताने केलीच पाहिजे, असे नाही.

बळीची व्यवस्था बंगाल करील— नव्हे करीतही असेल ! ! !

स मा प्त


## पुरंदऱ्यांची दौलत

श्रीमंत बाजीराव पेशवे / तुळशीबागवाला / खासा फिरंगी मारिला / जिद्द / खासगीवाला / खंडेराव दरेकर / तलवारीचे पाते / पालखी / पुरंदऱ्यांची दौलत

**नऊ पेशवेकालीन कथा**

ब. मो. पुरंदरे

किंमत : साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

# फॉस्फोमिन -



## अधिक उत्साह देते.



## भूक वाढविते. जोम वृद्धिंगत करते.



## शरीराची रोग-प्रतिकार-क्षमता वाढविते.




**खरोखर!...
फॉस्फोमिन म्हणजे
घरकुलांतील
आरोग्याचे कारंजे!**

व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्स आणि विविध ग्लिसरोफॉस्फेटस्युक्त उत्तम फलास्वाद असलेले हिरव्या रंगाचें टॉनिक—फॉस्फोमिन

SQUIBB TTT ® हा ई. आर. स्क्विब अँण्ड सन्स इन्कॉर्पोरेटेड यांचा रजिस्टर्ड ट्रेडमार्क आहे व करमचन्द प्रेमचन्द प्रायवेट लि. यांना तो वापरण्याचे लायसन्स आहे

SARABHAI CHEMICALS

Shilpi SC 50A/67 Mar

# व्यवहाराला चोख

कैलास देशपांडे

ऐन दोन प्रहरची वेळ होती. पिवळं धमक ऊन आपला उग्र चेहरा अधिकच क्रुद्ध करून ऐसपैस पसरले होते. रस्ता भणभण करीत होता. आजूबाजूची घरे, झाडे, सारे कसे निश्चल झाले होते. अगदीच कुठेतरी बारीकशी सावली अंग चोरून घाबरल्यासारखी दिसत होती, पण तिचासुद्धा थंडाव्याला उपयोग नव्हता.

अशा या कहारी उन्हाच्या कचाटयात मी सापडलो होतो. माझ्या डोळयांचा काळा चष्मा जणू पांढरा झाला होता. पायातल्या वहाणांनी गरम गरम रस्त्याचा व माझ्या पायाचा संबंध जोडून दिला होता. अक्षरश: लालेलाल झालेल्या तव्यावरून अग्निदिव्य करीत गेल्यासारखे वाटत होते! माझ्या डोक्यावरही माझ्या दाट केसां-खेरीज काहीच दुसरे आवरण नव्हते. त्यामुळे मी नखापासून शिखापर्यंत उन्हाच्या भट्टीत सापडलो होतो. माझी अगदी केविलवाणी परिस्थिती झाली होती व मी बराचसा चिडचिडा झालो होतो.

मी असा चाललो असतानाच पुढच्या वळणावरून डोक्यावर जरा जीर्ण झालेली छत्री, त्यानंतर मूळ आकार हरपलेली काळी टोपी, दोन्ही खांद्यांवरून अंगभर लोंबणारे, उपरणे, त्याच्या आत कोट, म्हणजे आत मुंडेछाट लांब बाह्यांचा शर्ट असणारच, नेसूला पंचा व पायात दहा ठिकाणी तुटलेली वहाण अशा अवतारात त्या रुक्ष रस्त्यासारखाच रुक्ष चेहरा घेऊन अतिशय सावकाश, सावकाश रस्त्यावरची मुंगी-सुद्धा न चिरडू देता भाऊ जोशी येत होते.

भाऊ जोशी म्हणजे चालता-बोलता पुतळाच! रत्नागिरीहून पुण्यात नशिब काढायला आलेल्या अनेक चित्तपावन ब्राह्मणांपैकी एकजण. आणि भाऊ होतेही तसेच! सारे गुण व अवगुण संपादन केलेले. अगदी अनुनासिकांतून बोलणारे, चोख वागणारे, रोख व्यवहार करणारे व निर्भीड आणि स्पष्ट! परंतु माझ्या वडिलांच्या गोता-वळयात ते कसे आले ते मला अजून समजत नाही; कारण माझे वडील अगदी यांच्याविरुद्ध भोंगळ बोलणारे, अघळ-पघळ वागणारे, भिडस्त व भोळसट.

"काय भाऊ, एवढ्या उन्हात ?" चेहरा शक्यतो प्रश्नचिन्हाकृती करून मी भाऊंना विचारता झालो.

"आँ !" आपल्या तंद्रीतून जागे होऊन भाऊ दचकले. आणि मग अधिकच बारीक असलेले डोळे अधिक किलकिले करून मला निरखीत विचारते झाले,

"नानांचा धाकटा मुलगा ना तुं ?"

काही काही माणसे डेक्कन क्वीनसारखी 'धाड धाड्' जाणारी असतात तर बरीचशी मेल–एक्प्रेससारखी मध्यम गतीची असतात; पण आमचे भाऊ अगदीच मालगाडीसारखे, जिवावर आल्यासारखे रेमाटत–रेमाटत, दम छाटत जाणारे होते.

फक्त अंथराय-पांघरायची पंचाची जोडी घेऊन भाऊ पुण्यात आले, नशीब उघडायला ! पण त्यांच्या या वृत्तीमुळे मुंबई सरकारच्या शेतकी खात्यात, कायमची



हं ! अशी कारकुनाची नोकरी मिळण्यातच त्यांना धन्यता वाटली. पेन्शन मिळणार होती ना ! मग आयुष्याचा सारा रस्ता या नोकरीच्या सोबतीने नाकासमोर लक्ष देऊन भाऊंनी काटला.

भाऊंच्या व्यवहारातला चोखपणा, वागण्यातला रोखपणा, बोलण्यातला ठोकपणा व चेहऱ्यावरचा थंडपणा पाहून इतरांना भाऊंचा संतापही यायचा व तापही व्हायचा. पण मला तर हसूच यायचे.

भाऊंच्या समक्ष एखाद्या घराचा आगीने भडका उडाला, अग्नीच्या ज्वाला गगनाला भिडू लागल्या, साऱ्या वातावरणात धुराचा अंमल झाला. आगीच्या उष्णतेने आजूबाजूची झाडे कोळपली, आग लागलेल्या घरातली माणसे मदतीकरिता किंकाळ्या फोडताहेत तरी भाऊ आपली उघडलेली छत्री बंद करून क्षणभरसुद्धा त्या आगीकडे पाहत उभे राहिले नसते. ते त्यांच्या रस्त्याने सरळ पुढे चालू लागले असते.

अगर भाऊंना स्वतःला लॉटरीतले पहिले एक लाख रुपयांचे बक्षीस न विभागता मिळाले याची बातमी आपण मोठ्या उत्साहाने सांगायला उड्या मारीत गेलो तरी भाऊंना साधा एक रुपया मिळाल्याचा जितका आनंद होईल तितकासुद्धा झाला नसता. निराकार, निर्गुण अशा दगडी भाऊंचे वागणे असेच विक्षिप्त होते.

भाऊंचा हा असला स्वभाव जात्याच, पण परिस्थितीने त्यात तेल ओतले होते. कोकणातून एकटा आलेला हा ब्राह्मण मधुकरी मागून व वार लावून मॅट्रिक झाला. मॅट्रिक झाल्या झाल्या कारकुनाची का होईना, पण नोकरी लागली. त्यानंतर भाऊंचे अशाच एका गरिबाच्या मुलीशी लग्न झाले. पण थोडेफार दिवस संसारसुख लाभले नाही तोच भाऊंची बायको चार कच्चाबच्चा पोरांना सोडून व भाऊंवर सारा संसारभार टाकून स्वर्गवासी झाली.

सर्वांत थोरली अक्का त्या वेळेस केवळ चौदा वर्षांची होती. त्यानंतरची दामू, काऊ व केशव ही पोरे तर अगदी अजाण होती. नोकरी सांभाळून व अनेक खस्ता खाऊन भाऊंनी मुलांना सांभाळले, जाणते केले. त्यांना चांगले वळण दिले. आई व बापाच्या दोन्ही भूमिका बरोबर बजावल्या. आपल्या रोख-ठोक वागण्याबोलण्याचा बरोबर उपयोग केला.

पण अलीकडे भाऊ खरोखरचे निवृत्त झाले होते. थोरल्या अक्काचे लग्न झाले होते. दामूला पुण्यातच नोकरी लागली होती व नुकतेच त्याचे लग्नही झाले होते. धाकट्या काऊलासुद्धा बऱ्यापैकी स्थळ मिळाले होते व शेवटचा केशव मुंबईला होता. भाऊ आता सरकारच्या व घरच्या दोन्ही सेवांतून मुक्त झाले होते; तरीपण भाऊंच्या मनाला व शरीराला लागलेल्या सवयींतून काही ते मुक्त झाले नव्हते.

एकदा असेच भाऊ खाणावळीतून बाहेर पडताना बघितले आणि मी चकित झालो. चकितच काय, दचकलोच ! मी आपोआप विचारता झालो, "भाऊ, इथं का ?"

भाऊंचा थोरला मुलगा दामू व त्याची बायको काही त्यांना घरी जेवायला नको म्हणाले नसते, पण भाऊंचा विक्षिप्तपणा उसळून वर झाला होता.

" दामूंच्या बायकोला माझा त्रास नको. मी दामूला चक्क सांगितलं की, दामू खाणावळींत जेंवणार." अगदी ठसक्यात भाऊ बोलत होते.

" अहो; दामूंच्या बायकोचीं दोन लहान मुलें " जणू ती मुले भाऊंची कुणीच नाहीत, " शिवाय दामूचे दहाचे ऑफिस. तिचीं उगाच तारांबळ होतें." भाऊंचे अनुनासिकांतले बोलणे चालूच होते. " मी दामूंला म्हटलें रोजच्या दोन वेळच्या चहाचें चार आणें म्हणजे महिन्याचें साडेसात रुपये व अंघोळीच्या गरम पाण्याचें अडीच रुपये असें एकूण दहा रुपये तुला देत जाईन."

भाऊंचा हा सख्ख्या मुलाशी चाललेला व्यवहाराचा खेळ माझ्याच्याने सहन होईना, पण भाऊंच्या चेहऱ्यावर विलक्षण निर्विकारपणा भरून राहिला होता.

असेच एकदा भाऊ आमच्या घराशेजारच्या दुधाच्या डेअरीत दिसले. नुसते बसलेले अगर गप्पा मारीत बसलेले दिसले असते तर काही वाटले नसते, पण भाऊ तिथे चक्क दूध पिताना दिसले. मी तुरा चक्रावून गेलो व पुढे होऊन त्यांना विचारता झालो.


## पुरंदऱ्यांची नौबत

बुलंद बुरूज / हूल / कोजागिरीची रात्र / पंत
फोंडा ! फोंडा ! / नावजी बलकवडे
पिऱ्या बेरड / इमान

**आठ शिवकालीन कथा**

ब. मो. पुरंदरे
किमत : साडेतीन रुपये
राजहंस प्रकाशन

" भाऊ, इथंच काय दूध पिता ?"

माझ्या या प्रश्नाचे भाऊंना काहीच वाटले नाही. उलटे शांतपणे त्यांनी सांगितले की, घरी दामूची लहान मुले आहेत. त्यांच्यादेखत दूध पिणे जमत नाही व दोन्ही मुलांना दूध देणे परवडत नाही. म्हणून मी इथेच दूध तापवून पिऊन टाकतो.

भाऊंचा या उत्तरावर निरुत्तर होऊन मी गप्प बसलो.

भाऊंच्या थोरल्या मुलीकडील बारशाच्या वेळची गोष्ट. बऱ्याच दिवसांनी तिला मुलगा झाला होता. त्यामुळे सगळीकडे आनंदीआनंद होता व बारसे मोठे करण्याचा घाट घातला होता, पण आमच्या भाऊंनाना खंत ना खेद ! सारे सारे विसरून एखाद्या अचेतन वस्तूप्रमाणे त्यांचे वागणे चालले होते.

बारशाची पंगत बसली होती. भाऊ मोठ्या मिनतवारीने जेवायला आले होते. त्यांचे जावईबापू मोठ्या उत्साहाने आग्रह करीत होते. भाऊंना पण त्यांनी आग्रह केला, तेव्हा भाऊ आपल्या प्रसिद्ध अनुनासिक उच्चाराने म्हणाले, " दांदां, उगांच या महागाईच्या दिवसात आग्रह करू नका. खाणाऱ्यांना काय फुकंट मिळालं तर खातींलच ! " त्यांच्या या उद्‌गारासरसे त्यांचे जावई चमकलेच व इतर जेवणारेही दचकले.

यावर कडी म्हणजे बाहेर पडतांना भाऊ मुलीला काय बजावतात. तर, " अक्कां, तुझ्यां मुलाच्या हांतांत तीन रुपये घातलेत. दोनच घालणार होंतों पण दादांनी जेवताना जरा आग्रह केंला म्हणून एक रुपया जास्त दिला. बरें कां !"

आपल्या तीर्थरूपांचे हे बोल ऐकून ती बिचारी चाट पडली ! पण काय करणार ! गप्प बसून व दुर्लक्ष करून तिने वेळ मारून नेली.

भाऊंना त्यांच्या लायब्ररीचे फार कौतुक. एवढे खरे, भाऊंनी देव – देव कधी केले नाही. त्यांची ठिकाणे म्हणजे दोनवेळ जेवणाला खाणावळ, दिवसभर लायब्ररीत व रात्री मात्र घरी. दुसरीकडे झोपायला जाण्याचा विक्षिप्तपणासुद्धा भाऊंनी मधून मधून केला होता.

" तुम्हीं आंमच्यां लायब्ररीत येंत जा. अहों, दिवसभर उघडीं असते. मीं तर दुपारचा तिथेंच जरा लवंडतोंसुद्धा ! घरीं आंमचीं मुलं जरा त्रास देतात. त्यापेक्षां हें बरें." भाऊंच्या लायब्ररीप्रेमाचे एक कारण म्हणजे दामूची मुले सांभाळायला नकोत. गंमत म्हणजे भाऊंनी कधी दामूच्या अगर अक्काच्या मुलांना हात लावला नाहीच. पण तें त्यांच्याकडे बघतही नसत. मग त्यांना सांभाळणें, खाऊ आणून देणे, त्यांच्याशी खेळणे व त्यांना खेळवणे या गोष्टी दूरच राहिल्या.

एवढे असून भाऊ कधी कधी विनोदही करीत असत. त्यांच्या थोरल्या जावयाची तब्येत तशी दणकट व ठणठणीत आहे. त्यांचे खाणे-पिणेही तसेच आहे; परंतु त्यांना मध्यंतरी 'फ्ल्यू'ने बरे नव्हते. त्या वेळेस एकदा असेच भाऊ मला भेटले. मी त्यांना विचारले, " भाऊ, दादांचं कसं काय आहे ?" त्यावर भाऊंनीच मला

उलट विचारले, " त्यांना कांयं झांलंय ?" व ते पुढे म्हणाले की, " अहों, दादांनीं मी आजारीं आहें असें सांगितल्याखेरीज समजतच नाहीं कीं तें आजारीं आहेंत म्हणून. "

भाऊंच्या या बोलण्यावर मात्र मला हसता हसता पुरेवाट झाली व मी पुढे सटकलो.

भाऊंच्या दरमहा मिळणाऱ्या पंचावन्न रुपये पेन्शनीचा हिशेव जणू काही एखाद्या सार्वजनिक संस्थेसारखा सर्वांना तोंडपाठ असे.

" हें बघां, मला मिळतांत दरमहा ५५ रुपयें. त्यांतलें ३५ रुपयें मी खानावळींला भरतो. आणि घरीं असलोंच तर दामूला देतों. उरलेल्या वीस रुपयातलें १० रुपयें चहा व अंघोळीला जातात व १० रुपये मी कपडे, तेल, औषध, पाणी यांकरतां शिल्लक ठेवतो."

भाऊंची ही रेकॉर्ड बहुतेकांना ऐकावीच लागते. कोणाकडूनही त्रास सोसायचा नाही व कोणालाही त्रास द्यायचा नाही, असले त्यांचे सर्वमान्य असलेले पण सर्व-संमत नसलेल्या जीवनतत्त्वाने त्यांना ग्रासले होते.

दरवर्षाला एक पंचाची जोडी, एक सेकंडहॅंड 'नवी कोरी' छत्री, काळी टोपी, दोन सदरे, या गोष्टी झाल्याच पाहिजेत, हा त्यांचा खाक्या !

असे हे भाऊ वारलेही असेच चोखपणे. सहज खोकल्याची उबळ आली. ठसका फारच मोठा लागला म्हणून धडपडत जाऊन ते स्वत: पाणी प्यायले आणि आडवे झाले. पण जे आडवे झाले ते परत उठण्याकरिता नव्हेच !

भाऊंच्या कोटातल्या खिशात एक चिठ्ठी मिळाली. त्या चिठ्ठीत लिहिले होते की, " पेटीच्या वरच्या कप्प्यात २५० रुपये ठेवले आहेत. त्यांचा उपयोग माझ्या अंत्यविधीकरिता करावा. दरवर्षी श्राद्धाचा विनाकारण त्रास घेऊ नये."

भाऊंच्या या चिठ्ठीमुळे सारेच हेलावले. पण हा प्रकार पाहून स्तिमितही झाले.

भाऊ इतक्या पटकन वारले की, अजूनही त्या रस्त्यावर ठराविक वळणावरून डोक्यावर छत्री धरून भाऊ येतील, असेच वाटते. जगाला उपद्रव द्यायचा नाही व हो, तितकाच घ्यायचाही नाही ! मग तो मुलगा असो वा जावई असो, अशाच निश्चयाने भाऊ जगले व वारलेही.



# पुस्तकें

## नव्या कविता

## सामर्थ्य, सौंदर्य आणि मर्यादा

**निशिकांत मिरजकर**

आकाराने अगदी छोटेसे असलेले एक नवे पुस्तक. त्यात कविता सुबकपणे छापलेल्या. मात्र कविता वाचायला प्रारंभ केला की एकदम सगळा नवीनतेचा प्रत्यय. अनुभूती, तिचा आविष्कार, त्यातली प्रतिमांची गुंफण, शब्दयोजना, सारेच एकदम वेगळे. नवीन. ठिकठिकाणी जुन्याला दचकवून टाकणारे. सनातनतेला उद्ध्वस्त करणारे. स्वतःचा प्रामाणिक वेगळेपणा धृष्ट परखडपणाने व निरर्गल स्पष्टतेने जपणारे.

'कुंती : एकच कविता' ही पहिलीच दीर्घ कविता या वेगळेपणाचा सूचिप्रत्यय देते. जुन्या विषयावरची नवी उत्कट अनुभूती मांडणारी ही कविता. त्यातली भाषा भव्य आहे. कल्पना भव्य आहेत. प्रतिमा भव्य आहेत ('गावरानंही आहेत.') पण या दीर्घकवितेचे 'दीर्घत्व' जाणवते ! ज्या एका सुन्न, उदात्त मूडमध्ये कविता सुरू होते व वाहण्याचा प्रयत्न करते तो धागा मधूनमधून सुटत जातो. शब्दजंजाळात व अकारण ग्राम्यतेत गुंताडत जातो. विरुद्धार्थाचे खटके व मधूनच सामान्यपणाचे वैरस्य यामुळे ह्या कवितेतल्या वेगळ्याच पातळीवरच्या भव्यतेच्या मनावर उमटणाऱ्या खुणा लगोलग पुसल्या जातात.

यातले अनुभवशाली कविमन काहीतरी विलक्षण निराळे आहे. ही पहिल्या कवितेने करून दिलेली जाणीव मात्र पुढे जास्तजास्त ठळक होत जाते. या वेगळ्या, विलक्षण मनाला येणाऱ्या प्रतीती अतिशय आवाहक प्रतिमांच्या भाषेतून, कवितांमधून व्यक्त होतात. आपल्या उत्कट संवेदना या प्रतिमांमधून प्रतीकात्मकतेने त्या मनाने मांडलेल्या असतात. या प्रतीकांच्या आकृतींमध्ये फार तीव्र अर्थ अगदी हळु-

वारपणे एकमेकांत गुंफलेले असतात. उदाहरणार्थ ' आरसा ' या एका मुक्त सुनीतात.

"कवडशांचा धूप जाळणाऱ्या सूर्याचे आयुष्य गिळलेस तू
तेव्हाच रानातल्या सशांनी संभोग उरकून घेतला
फडफडणाऱ्या गीतांना हाकवित उडाले पक्ष्यांचे थवे तेव्हाच
तेव्हाच तुझ्या अस्तित्वाचा अर्थ शिरत गेला झाडाझाडावर"

किंवा

"कुंकवाच्या टिळ्याने तंबूच ठोकले ईव्हच्या कपाळावर
तेव्हा तू विषवृक्षावर बसून हाडांची पुंगी वाजवीत होतास"

या वर्णनातून ' आरसा ' या कल्पनेचा एका वेगळ्याच कोनातून छेद घेतला जातो. आरसा हे फार प्रभावी व समर्थ अस्तित्वकल्पनेचे प्रतीक बनते आणि त्याच्या जोडीने जीवनातल्या उत्कटतेचा भिन्न आविष्कार, सौंदर्यजाणिवांची तरल क्षणिकता, सृजनातल्या बेभानपणाच्या ज्ञानाबरोबर जखडून टाकणाऱ्या व्यवहारबंधनांतील भीषण विनाशकता हे सगळे पराकाष्ठेचे क्षुद्र, उपहासपूर्ण बनून आपल्यापुढे येते. त्यातील अर्थपूर्णतेची खोली जाणवत राहते. ' रस्ते ' ही सबंध कविता याच प्रकारची आहे. ' आवर्त ' या एकाच शब्दात या कवितेचे वर्णन करता येईल. सुन्न करणारे, गरगरून टाकणारे आवर्त. ' रस्ते ' या शब्दाच्या पुनःपुन्हा घडणाऱ्या आवर्तनाशी संलग्न असे रस्त्यावरच्या जीवनाचे विदारक आवर्त. कसल्याही भाबड्या सहानुभूतीच्या बुरख्याशिवाय स्पष्टपणे मांडलेली विमनस्कता. आणि

"रस्त्यांना आत्महत्या करता येत नाही,
कारण त्यांना आत्मा असतो
रस्ते कविता करतात,
कविता बहुधा माणसांवर करतात."

असा कवितेचा ठसठशीत शेवट. सगळ्या स्पष्ट विदारकतेचा आलेख टोकदार करणारा.

मानवी अस्तित्वाविषयीची ही वास्तव विमनस्कता या कवितांमध्ये अनेक ठिकाणी विमनस्क प्रतिमांचे कवडसे टाकीत जाते. कोण्या देशीचे मोर कवीला इथल्या मृगजळात दिसतात, पण त्यांच्या ' सैरभैर येथे पंखांचे अर्थ धुरकट ' असतात. ' मरगळ गाते वेताळगाणी ' असे कवीला वाटते. आकाशपक्ष्याचे आवाहान करतानाही, ' मातीत इथल्या तुझे स्तन उखडून, तू ये गिधाड होऊन ' या विमनस्कतेनेच ते केले जाते. त्या पक्ष्याने ' फूलपण चोचीत विसरून अक्रोड वेचीत ' यावे म्हणून कवीचे मतिक त्याच्यासाठी आ वासून पडलेले असते !

तथापि याच मानवी अस्तित्वात कधीकधी गहिऱ्या सौंदर्याच्या छटा आढळतात.

---

[' मतिक ' : चंद्रकांत खोत : संहिता प्रकाशन : मूल्य पाच रुपये : पृष्ठे ८४ ]

---

ऱ्या सौंदर्याच्या वेगळ्याच सखोल जाणिवेने मन उमलून येते. या निगूढ अस्तित्व-सौंदर्याच्या आकृती रेखाटण्यासाठी कवी अपरिहार्यतेने निसर्गप्रतिमांकडे वळतो. ही कवीची निसर्गाशी काव्यात्म एकरूपता मनापासूनची असते. अस्तित्वसौंदर्याची हळुवार अनुभूती तन्मयतेने निसर्गाच्या रूपात प्रतिबिंबित होते. कुणाच्यातरी अस्तित्वाचे पावसाळे होते तोवर क्षितिज पेरून ठेवले जाते. आकाशीच्या सस्तन पक्ष्यासाठी स्मित ठेवलेले असते. व्हाळावर साकवाचा घर, पानऱ्यावर कासवाचा घर, आबाळात ढगाचा घर, वाऱ्यावर धगाचा घर यांच्याप्रमाणेच मनात काहीतरी अधांतरी उमलून येते. तरंगत राहते. 'ओले मंतर कोले मंतर' करून जाते. पिंपळपानांची लाट फुटून धूसर झालेले घर आणि जुनाट वाऱ्यात पंख ओढून थरथरती लव झाकून घेणाऱ्या खिडक्या यांच्या वर्णनातून एक गाढ अनुभव रम्य प्रतिमांच्या घाटदार आकृतीतून मांडला जातो. इथे सौंदर्य दिसते. उत्कटता जाणवते. मोह घालत.

**" सर्द हवा, दर्द दवा**
**काचेऱ्या वाळूंचा**
**मस्त खवा. "**

यासारख्या गतिमयतेचा आश्रय करून कधी या सौंदर्यानुभूती येतात, तर कधी

**" गर्भवती पापण्यांची**
**पालवली कूस आता**
**लखलख गर्भखुणा**
**ओसरल्या हातोहाता "**

अशा मोहक अर्थपूर्ण शारीरानुभूतींची वाट त्या स्वीकारतात. इथे शब्द कसे भारावून येतात. बोरकरी थाटाचे सौंदर्य सापडते. नाद आणि रूप यांची संश्लिष्ट लय निर्माण होते. अर्थपूर्ण प्रतिमेचे रेशमलेखन जाणवते. मर्तिकाचे आकर्षण आणि विमनस्कतेचा ध्वस्त प्रत्यय अनुभवणाऱ्या कवीचेच हे प्रतिमालेखन आहे हे कधीकधी पटेनासे होते. 'रातांबा' या कवितेतील अनुभवाची रेखीव सौंदर्याकृती, 'चंदनऊन' या कवितेतील नुकत्या उगाळून ठेवलेल्या, घराच्या कौलांनी माखून घेतलेल्या, गंध साठवणीत ठिबकून उगाच घुमणाऱ्या उन्हाचे वर्णन, 'माझ्या गहिऱ्या डोळ्यांनाही तुझी पापणी शेज बनू दे' किंवा 'माशावरची माझी खवली तुझ्या मुखावर नीट रचू दे' यासारखी 'वलय' या कवितेतली लाडिक भावपूर्ण विनवणी, वैशाखात जुळे जुळे बनून येणारे ऊन या सर्व अशा तऱ्हेच्या रम्य सौंदर्यानुभूती आहेत. मोहविणाऱ्या

**" ओष्ठद्वयांवर ठेवुन घागर**
**कोरित काठाखाली नक्षी**
**रेषांना क्षण तडे जडावे**
**दूर उडावे बावन पक्षी "**

किंवा  " कौलारातून वळत्या रेषा
वळता वळता बूच उडावे
फसफसणाऱ्या तुझिया नेत्री
फेनफुलांचे पक्षी गावे. "

यांसारख्या आविष्कृतींचे रम्य सौंदर्य अनुभवानेच जाणून घ्यायचे आहे. शब्दांच्या स्पष्टीकरणाची त्याला जरुरीच नाही.

पण कधीकधी खोतांच्या कवितेत निसर्ग निराळ्याच प्रकाराने संबद्ध होतो. इथे तो उत्कट भावसौंदर्याशी एकरूप झालेला नसतो; तर न पेलणाऱ्या एका खळबळलेल्या विलक्षण अनुभूतीचे प्रतीकात्मक आलेखन करण्यासाठी कवीला निसर्ग आठवतो. अविश्वासाच्या साथीत कित्येक बंधने गमावून श्वासांचे घोट घटाघट गिळत फासावर लटकत असताना कवी ताऱ्यांशी 'दूरस्थ संभोग' करीत राहतो. आपल्या असहाय आर्ततेच्या जाणिवेने व्यथित होतो. एका झाडाचे प्रतीकचित्र रेखाटताना, लांबवर गीत पिंजणाऱ्या ओढ्याला काढक्यांचे केस भराभर विस्कटीत झाड हसत असल्याचे कवी सांगतो. एक करडा पक्षी यावा, खांद्यावर बसावा आणि बघता बघता तो निदानपक्षी शिटून जावा एवढा एकच ध्यास त्या झाडाला लागलेला असतो. पांगऱ्यावरल्या पाखराने 'आभाळ माळून व्हावे शहाणे' अशी कवीची अपेक्षा असते. धुक्याचे असंख्य अर्थ आकाशात असून त्यांची लिपी ज्याच्या त्याच्या मनात आहे असे कवीला वाटते. रात्रीचे हिरवे संभोग क्षण तसेच रेंगाळून दरीत रुजून आलेले आत्मे त्याला दिसतात. वेलींनी झाडांना मीलनमासी विकलेले श्वास त्याला जाणवतात. 'खूप वेळ स्तब्ध राहिलीस तर हंगाम डावलून तुझे कणीस येथेच रुजेल' असे तो कुणालातरी मोहविणाऱ्या धीटस स्पष्टतेने इशारे देतो. हिवाळ्यात जेव्हा आकाश बर्फ होऊन नांदायला येते तेव्हा एकुलता लोकरी कोट स्ट्रीट बेगरवर उधळून देणाऱ्याचे कौतुक करतो. 'समुद्रासाठी प्रेमगीत' ही कविता म्हणजे तर विलक्षण विराट शारीर एकरूपतेचा अनुभव आहे. पुन्हा ही शारीर एकरूपता समुद्राशी आहे. त्यासाठी उत्कट प्रतीक्षा आहे. त्यासाठी जीवनाशा आहे. ते भोग हपापलेले आहेत. इथे कामशास्त्रीय उल्लेख, मैथुनप्रतिमा, गर्भस्राव— सगळे आहे. पण ओढ आहे ती जुळून पडलेल्या नागविळख्याची. त्या एकतानतेची!

एकंदरीतच मृत्यू आणि योनी ही दोनच चंद्रकांत खोतांच्या अनुभूतीची तीव्र टोके आहेत. कधीकधी दोन्हींचा घट्ट गोफ विणलेला आढळतो. कधी एकात दुसऱ्याचा लय पावलेला असतो. अतिशय विच्छिन्न असा हा लय असतो. निसर्गाच्या मनस्वी रूपातही त्या परिचित दोन प्रतिमांची सनातन प्रतिबिंबे या कवीला दिसतात. बऱ्याच वेळा ही प्रतिबिंबे त्याची गडद अनुभूती प्रामाणिक उत्कटतेने चित्रित करतात. पण कधीकधी ती आगंतुक असतात. उगाचच डॉमिनेटिंग वाटतात.

या कवीने घेतलेले काव्यात्म अनुभव निराळेपणाचे असल्यामुळे आणि ते त्याच निराळेपणाने संवेदनामय चित्रांनी व्यक्त करण्याचा त्याचा प्रामाणिक प्रयत्न असल्यामुळे याची प्रतिमासृष्टी अत्यंत वैविध्यपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण बनलेली आहे. त्यात वाऱ्याच्या जळणाऱ्या झुळुका आहेत. लाजाळूच्या घरावर कोसळणारे तीनशे पासष्ट कडे आहेत. त्याला शेवग्यावर ईश्वराच्या मायेचे स्तन आढळतात आणि ईश्वराच्या अस्तित्वाला पान्हा फुटलेला तो पाहतो. बत्तीस मजली इमारती रतीमध्ये गच्च ताकदीच्या पासष्ट रांडा त्याला सिगरेटी धुरात दिसतात. विष्ठेचे वाळवंटी घर, जोहार करीत उभे असणारे चाकरमानी गज, घर्मबिंदूंचा मकरध्वज, लाटलाट घुसळीत पिंजलेली काठबने,–ही अशाच प्रतिमासृष्टीची उदाहरणे.

यातल्या ' मालवणी कविता ' हा एक वेगळाच प्रकार आहे. नावीन्य, सहजता आणि स्पष्ट, पाशवी वास्तवता यांमुळे या कविता (चुकून) आवडूनही जातात. ' ईश्वर : दोन मूड्स् ' या दोन कविताही मला आवडल्या. या दोन्ही मूड्स्ना स्वतःचे आकार आहेत. वेदनेचे, त्वेषाचे, उपरोधाचे आणि प्रसन्नतेचे, उत्कटतेचे, वात्सल्यसौंदर्याचे. ईश्वराच्या मनस्वी कल्पनेचे घेतलेले हे दोन वेध. दोन्हींना आधार वास्तव जीवनाचाच. आणि हे जीवन मनापासून अनुभवलेले, पाहिलेले. तशाच कारागृहाविषयीच्या पाच कविता. ' दर्शना 'पासून ' भैरवी 'पर्यंतच्या. कारागृहाची तुच्छ निरर्थकता आणि बेडौल विडंबनात्मकता दाखविणाऱ्या. हे विडंबन माणुसकीचेच नाही, तर माणूसतेचे आहे.

तर अशा या काही नव्या कविता. परिचित प्रतिमांच्या जोडीने वैयक्तिक पण मनस्वी प्रतिमांच्या भाषेत लिहिलेल्या. भावनेने ओथंबलेले सौंदर्य व हळुवारपणाचे, भावाकुलतेचे नवे दर्शन घडविणाऱ्या, आणि त्याचबरोबर ' सुंता केलेले जननेंद्रिय,' ' विटाळशी किस्मती,' ' कवीजे तांडे नग्न,' ' थोटे वृषण,' ' सडलेल्या गर्भाशयात चक्रव्यूह भेद ऐकत पडलेला चर्चमधला बंदिस्त ख्रिस्त ' यासारख्या बीभत्स प्रतिमा बेदरकारपणे वापरणाऱ्या. ' ट्रॅन्झिस्टरचे बॅटरी सेल ' आणि ' कवींचा सेल ' यांसारख भुक्कड यमकही हा कवी कधी जुळवतो, कधी जुनीच कल्पना फक्त नव्या विक्षिप्तपणाने मांडतो, तर कधी ' कबाबी संस्कृती,' ' कागदी संस्कृतीचे टाकमोड खोदकाम,' ' निस्तेज संघर्षाचे बेडीदार लखोटे,' ' वेश्यांच्या आर्ष योनी '–यांसारख्या प्रतिमांच्या योजनेने मोठाले आशय सहजतेने सांगून जातो. निरर्थकतेकडे झुकणारी जटिल दुर्बोधता, बीभत्सतेच्या डबक्यांतून उसळून बनणारी परिणामकारकता, वळवळणाऱ्या क्षुद्र जीवनाची तीव्र जाणीव ही सगळी वैशिष्टये या कवितांमध्ये दिसतात. बीभत्सतेच्या गर्तेत कोसळता कोसळता एखादी कविता वेडीवाकडी वर उसळते आणि काहीतरी फार वरच्या दर्जाचे सांगून जाते. स्वत्त्वाच्या बेगडीपणाची जाणीव करून देते; तर उपरोधाने भरलेल्या एखाद्या कवितेत अत्यंत विफल, वंचित, ध्वस्त जीवनाविषयी आंतरिक ओढ दिसते. त्यातल्या अर्थपूर्णतेची प्रतीती दाखविते. जगा-

विषयीची तुच्छता रोगट नाही. कारण मुळातल्या अलिप्त गाभ्याची जाणीव झालेली आहे याची ग्वाही देते. अत्यंत ग्राम्य वर्णन कुठे आढळते, तर कुठे परखड नवीन प्रतिमांच्या भाषेत अर्थाचे शिंपण केलेले दिसते. ते बहुपेडी व बहुपिंडी असते. खोलवर रुजणारे असते. पावित्र्य, गांभीर्य, परमेश्वरी चिंतन यांच्या तकलादू आवरणाचे तिडीकवाणे भयानक बीभत्स वास्तव कुठे चित्रित केलेले असते, विरोधात्मक वास्तवप्रक्रियेच्या जोडचांचे परिणामकारक प्रहार असतात; तर कुठे दचकवून टाकणारी वस्तुदर्शी बीभत्सता जाणवते. प्रत्ययकारी आलेखन होऊनसुद्धा ती बीभत्सताच उरते. आणि मग असे वाटत राहते की १९६८ च्या कवितांमधली भयानक, दचकवणारी, धृष्ट वास्तवता आणि मागच्या ६२–६३ च्या कवितांतला हळुवार सौंदर्यदेखणा टपोरेपणा हा कशाचा आलेख मानायचा? जगाची वृत्ती, कवीचे अनुभव, कवीचा विकास–काहीही याला कारण असो, मराठी रसिकांच्या सध्याच्या अभिरुचीला जुन्या कवितांचीच मोहिनी वाटत राहील. नव्या कविता सार्थ असतील, नव्या वाटा खोदणाऱ्या असतील, पण जुन्या कवितांचा ऊर्विलास मनावर रेखीव अन् कोरीव नक्षी कोरून जातो हे मात्र खरे.

□ □ □

 [ पृष्ठ ११ वरून ]

## कलेचे माहेरघर

कै. गोविंदराव टेंबे, बी. नांद्रेकर, सरोज बोरकर वगैरे जुन्या नटनटींनी आपल्या मानलेल्या ह्या वास्तूत माडगूळकरांचा 'रामजोशी' बाबूराव पेंटर ह्यांच्या दिग्दर्शनाखाली साकार झाला. माडगूळकर पटकथा-लेखक, कवी, शाहीर म्हणून अनन्यसाधारण स्थान मिळविते झाले ते येथेच. गदिमांच्या प्रासादिक ओव्या-अभगांना मधुर चाली लावून रेडिओच्या मधू कानेटकरांनी म्हटल्या त्या येथेच. बाबूराव गोखले काव्याच्या प्रांतातून नाटककार झाले ते येथेच आणि प्रो. माधव कानेटकरांना नाटकाचे 'जर्म्स' सापडले तेही येथेच. विश्वास कुंटयांचे अनेक वर्षांचे विश्वाचे स्थान हेच, तर बाळ कोल्हटकर आपली 'जुडी' घेऊन मुक्काम करतात तो येथेच. त्यांच्या जोडीला आता लोकनाटयातील वर्षा, उषा चव्हाण वगैरे वऱ्हाडीही डेरेदाखल होऊ लागले आहेत. मधुराव कानेटकर, के. डी. दीक्षित, दिनकरराव अमेंबेल, सीताकान्त लाड वगैरे रेडिओच्या मंडळींची ये जा एका काळी नित्याचिच असावयाची. संगीताच्या प्रांतात तर मोजदाद करणेही मुष्कील. मल्लिकार्जुन मन्सूर, बसवराज, गंगूबाई हनगल ह्या कानडी मंडळींच्या बरोबरीला वसंतराव देशपांडे, भार्गवराम आचरेकर हे पुण्याचे वाण. उत्तरेतून पं. कृष्णराव पंडित, बऱ्हाणपूर पखवाजे वगैरे मंडळी हक्काने यावयाची. पं मल्लिकार्जुन, बसवराज ह्यांना मुंबईची ओळख छोटूबुवांमुळेच झाली असे ते स्वतःच सांगतात तर निवृत्तिबुवा सरनाईक ह्यांना मुंबईत स्थायिक व्हावयास छोटूबुवांचीच मदत झाली. गजाननबुवा जोशी तर त्यांचे जुन्यांतील जुने मित्र. कितीदा भांडले आणि कितीदा एकमेकांच्या गळयात पडले ह्याला काही सुमारच नाही. त्यांचे वडील कै. अनंत मनोहर मुंबईस आले की छोटूबुवांच्या पाहूणचारास येत. पद्मभूषण केसरबाई केरकर, मोगूबाई कुर्डीकर, अंजनीबाई लोलेकर, श्रीमती नार्वेकर, तसेच वयोवृद्ध-तपोवृद्ध अंजनीबाई मलिपेकर वगैरे आजच्या गायिका छोटूबुवांच्या शब्दाला मान देत. कुमार गंधर्व मुंबईस आल्यावर एकदातरी छोटूबुवांना भेटल्याशिवाय जात नसत. बाल गंधर्वांनाही (हिंडत फिरत असत तोपर्यंत) छोटूबुवांचा आधार वाटे. कित्येक महिने रोज संध्याकाळी नित्यनियमाने नारायणराव बोर्डिंगमध्ये येत असत. घटका दोन घटका गप्पागोष्टी चालत. कधी लहर आली तर गातही. अर्धी चड्डी व अर्धा शर्ट घातलेली त्यांची ठेंगणी मूर्ती बोर्डींगमध्ये जाता-येता दिसली की लोकांच्या माना उंचावत. मास्तर कृष्णराव ह्यांच्याशीही छोटूबुवांचे घरोब्याचे संबंध होते. आजचे आघाडीवरील सर्व गायक, राम मराठे, सुरेश हळदणकर, माणिक वर्मा, काणेबुवा, यशवन्तबुवा वगैरे मंडळी, तसेच जगन्नाथबुवा पुरोहित, प्रो. देवधर, नारायणराव व्यास, मनोहर

बर्वे, वामनराव सडोलीकर वगैरे जुने गायक जाता-येता छोटूबुवांकडे वळल्याशिवाय पुढे जात नसत. आपल्या अकृत्रिम प्रेमाने छोटूबुवांनी सर्व गायक-वादकांत एक आगळे स्थान प्राप्त करून ठेवले होते. त्यामुळेच खाँसाहेब विलायत हुसेन खाँ ह्यांची १९५३ च्या सुमारास संगीत अकादमीवर नियुक्ती झाली त्या निमित्ताने त्यांना निरोप देण्याच्या समारंभाचे अध्यक्षस्थान छोटूबुवांना देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. त्या वेळी त्यांनी केलेल्या सुंदर भाषणाने श्रोते स्तिमित झाले. तसेच संगीत शिक्षक संघाच्या वार्षिक मेळाव्यात आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी तबल्यासंबंधी केलेले विवेचन लोकांच्या स्मृतीत अजून ताजे आहे. दादर-माटुंगा भागात एक उत्तम म्युझिक सर्कल असावे, ही डॉ. जोशी ह्यांची कल्पना मूर्त स्वरूपात आणण्यात छोटूबुवांनी जिवापाड मेहनत घेतली. आजचा 'दादर-माटुंगा सोशल क्लब' ही नावाजलेली संस्था हे त्यांचेच स्मारक म्हणावे लागेल.

## दानधर्म

छोटूबुवांनी खूप मिळविले आणि दोन्ही हातांनी वाटले. गायक-वादकांना तर मुक्त हस्ताने मदत केलीच. कधीही विन्मुख पाठविले नाही. पण ज्या ज्या संस्थांबद्दल त्यांना आपुलकी वाटत असे त्यांना त्यांना नित्यनियमाने ते मदत करीत. हिंगणे शिक्षण संस्था, श्रद्धानंद आश्रम, वाई पाठशाळा, तसेच अनेक शिक्षणसंस्था ह्यांना न मागताही देणगी मिळे. पण दिलेल्या दानाची त्यांनी चुकूनही कधी वाच्यता केली नाही किंवा त्यांच्याकडून काही अपेक्षा केली नाही. आल्या गेलेल्या मित्रांना त्यांच्या आव-

### अविस्मरणीय बैठक

अहोरात्र गायक-वादकांच्या मेळाव्यात असलेल्या छोटूबुवांच्या ह्या वस्तीत आजतागायत किती मैफली झाल्या असतील त्यांची मोजदाद करणे मुश्कील. तरीपण एका अविस्मरणीय मैफलीचा उल्लेख करावयास हवा! बहुधा १९४२ सालची अखेर असावी. खाँसाहेब अल्लादिया खाँ साहेब ह्यांच्या मैफलीचा योग घडून आला. खाँसाहेबांनी खाजगी बैठकीसुद्धा सोडून दिल्याला अनेक वर्षे झाली होती. त्यामुळे ह्या बैठकीला असाधारण महत्त्व. गायक खाँसाहेब अल्लादिया खाँसाहेब, मागे तंबोऱ्यावर त्यांची पट्टशिष्या केसरबाई केरकर, तबल्यावर खाँसाहेब तिरखवाँ आणि समोर होते प्रख्यात सरोदिये खाँसाहेब हफीजखाँ. भारतीय संगीतातील शेवटचे शब्द! किंवा डॉ. जयकरांनी म्हटल्याप्रमाणे माऊंट एव्हरेस्ट! पैशाच्या राशी ओतल्या तरी अशी बैठक पुन्हा होणे नाही. ज्यांना ही बैठक पाहण्याची, ऐकण्याची संधी मिळाली ते धन्य जाहले. पुन्हा असा योग येणे शक्य नाही.

डीचे मुद्दाम करवून खाऊ घालण्याची छोटूबुवांना मनस्वी आवड ! कोणीही पाहुणा छोटूबुवांचा पाहूणचार घेतल्याशिवाय खाली उतरणे दुरापास्तच ! ओळखीच्या परिचित गायक-वादकाने पैसे देऊन बोर्डिंगमध्ये जेवलेले त्यांना आवडत नसे, म्हणून कित्येकजण आधीच गुपचूप जेवून घेत व नंतरच छोटूबुवांच्या भेटीस त्यांच्या खोलीकडे वळत.

## एकाकी जीवन

पण इतक्या मित्रमंडळींच्या, कलाकारांच्या सान्निध्यात राहूनही छोटूबुवा एकाकी जीवन कंठीत होते, हे सांगूनही कोणाला खरे वाटणार नाही. शिक्षणाचे वय होते तेव्हा शिक्षणाशी नफरत केली आणि शिक्षणाचे वय गेल्यावर शिकण्याचा आटापिटा सुरू केला. लग्नाचे वय होते तेव्हा लग्नाचे मनावर घेतले नाही आणि उतार वयात मनात आलेला विचार विवेकाने झटकून टाकावा लागला. छोटूबुवांच्या बाबतीत असे ' गाडी चुकण्याचे ' योग अनेक आले आणि त्यांनी त्यांच्या आयुष्याला एकलकोंडे, हेकट, दुराग्रही बनविले. आपल्या माणसांपेक्षा मित्र म्हणविणाऱ्या स्वार्थी लोकांचा त्यांच्यावर पगडा बसला. परिणामी आप्त दूर झाले, सच्चे मित्र अंतरले आणि संधिसाधू लोकांचे फावले. परिणामाकडे दूरदृष्टीने पाहण्याची ताकद मंदावली. डोळ्यांना त्रास होतो म्हणून खिडक्या दारांना गडद निळे पडदे लावून व लोकांना त्रास नको म्हणून स्वतःला खोलीत बंद करून त्यांची तबल्याशी अत्यंत केविलवाणी झटापट होऊ लागली. शरीराची हेळसांड होऊ लागली. त्यातच हृदयविकाराचे दुखणे बळावले. धंद्याचीही घडी विस्कटली आणि आपण जे काही मोठेपण मिळविले तो केवळ भास होता, असे त्यांना वाटू लागले. अशा काहीशा पराभूत मानसिक अवस्थेतच अचानक त्यांचा अन्त झाला. मरणाची चाहूल त्यांना लागली होती की काय, कोण जाणे ! आदल्या दिवशी मध्यरात्र उलटून गेली तरी त्यांच्या तबल्याचा रियाज चालूच होता तो त्यांच्या अखेरच्या क्षणापर्यंत. आपल्या आवडत्या वाद्याचा अखेरचा निरोपच जणू ते घेत होते, पुन्हा भेट होणार नाही ह्या व्याकुळतेने !

आता त्या अतिथिगृहात गेलात तर छोटूबुवांची जाण करून देणारे ते ' कि डा न धा । ' पुन्हा कधीही ऐकू येणार नाही. सगळे कसे शांत, शांत. आणि त्या भयाण शांततेतूनच मागे अनेक वर्षे रेंगाळत राहील ती आठवण ह्या सामान्यांतील असामान्य माणसाची, मूर्ती घडविणाऱ्याची, पडद्यामागील कलाकाराची. आणि त्या रस्त्याने जाता-येता अभावितपणे चमकून तुम्ही वर पाहाल तर तुमच्या मनःचक्षूंस दिसेल खांद्यावर टुवाल टाकलेली छोटूबुवांची मूर्ती ! हात वर करून आग्रहाने म्हणत असेल, " वर या, अहो, वर या ! "

◻ ◻ ◻

# तुमचे भविष्य आमचा अंदाज



श्री. गो. जोशी, सायनाचार्य

दि. ९ ते १५ ऑगस्टचे भविष्य

**मेष :** सूर्य सिंहराशीत येत आहे, आल्यासारखाच आहे. सूर्याची ही विशिष्ट अवस्था तुमच्या जीवनात प्रचंड क्रांती घडवून आणणारी असते, असाच आजवरचा आपला अनुभव असेल.

नजीकचा भविष्यकाळ आपल्या आशा–आकाक्षांची क्षितिजे विस्तारवील. साडेसातीने केलेली कोंडी याच वेळी फुटेल, नोकरी–व्यवसाय–शिक्षण या बावतींत आपल्या अपेक्षा बऱ्याच प्रमाणांत सफल होतील. तुमचे कर्तृत्व दाही दिशा चौफेर उधळू लागेल. निदान महिनाभर तरी तुम्हांला कोणत्याही बाबतींत माघार घेण्याचा प्रसंग येणार नाही.

आपल्या मनावरील दडपण दूर होईल, भविष्यकालीन प्रगतीची प्रसादचिन्हे या आठवड्यापासूनच दिसू लागतील.

दि. ९–१०–१४–१५ येथूनच आपली पावले प्रगतीकडे पडू लागतील.

**वृषभ :** या वेळचा सूर्य–मंगळ त्रिकोण आपल्या आजवरच्या साऱ्या व्यथा–वेदना पूर्णत्वाने दूर करील. नवे काही करून दाखवण्याची ऊर्मी निर्माण होईल आणि त्या बाबतीत आपणांस अनेकांचे सहकार्यही लाभेल.

प्रवास, बदल, स्थानांतर यांपैकी काहीही घडेल आणि या बदलणाऱ्या अवस्थेतूनच आपल्या उज्ज्वल भविष्यकालाचे आपणांस दर्शन घडेल.

यांत्रिक–तांत्रिक व्यवसायाशी संबंध असणारांना हे दिवस पर्वकालासारखे जाणवतील. शुक्राच्या अनुकूलतेमुळ साहित्यिकांनाही हे दिवस अपेक्षासाफल्याचे ठरावेत.

दि. ११ ते १४ या कालावर लक्ष केंद्रित करा.

**मिथुन :** सूर्य आणि तोही सिंह राशीचा. तो पराक्रमस्थानाकडे यायला निघाला आहे ! ही अनन्यसाधारण अवस्था वर्षातून फक्त एकदाच लाभते. म्हणून तिच्याकडून विशेष काही घडावे, अशी अपेक्षा बाळगली जाते.

उद्दीपित करावे, दिपवून टाकावे, स्तिमित करून सोडावे अशी जी आपली

आंतरिक तळमळ आहे, तिला उत्थान देणारी ग्रहस्थिती निर्माण होत आहे. या काळाचा अधिकाधिक लाभ उठवलात तर आपल्या साऱ्या विवंचना मिटून जातील.

उद्योगधंद्याचे नवे क्षेत्र हस्तगत होईल, बढती-बदलीचे योग स्पष्टपणे दिसू लागतील, राजकीय क्षेत्रात तुमच्या उपस्थितीची गरज भासेल, शिवाय अनेक वैयक्तिक योजना आकार घेऊ लागतील.

दि. १३ ते १५ विशेष अनुकूल काळ.

**कर्क** : काव्य, निसर्ग, सौंदर्यात रममाण होणारा आपला स्वभाव, सामान्य जनतेच्या भावनांशी समरस होणारी आपली प्रवृत्ती. या आपल्या प्रवृत्तींना उत्थान देणारी ग्रहरचना या आठवड्यापासून निर्माण होत आहे; आणि त्यामुळेच आपल्या आजवरच्या बऱ्याचशा असफल आशाआकांक्षा या आठवड्यापासून सफल व्हायला लागतील.

साहित्य-कला-नाट्य या क्षेत्रांत आपले महत्त्व वाढीस लागेल. आपल्या व्यावसायिक योजना गतिमान बनू लागतील.

आपल्या नोकरीधंद्याचा प्रश्न अपेक्षेप्रमाणे सुटेल. राहण्याची जागा, वाहन या बाबतींतही आता आपणांस सहसा चिंता करावी लागणार नाही.

धनस्थानातील सूर्य-बुधामुळे सांपत्तिक लाभही अपेक्षेप्रमाणे घडून येतील. राजकीय क्षेत्राशी आपला घनिष्ठ संबंध यायला लागेल.

दि. १२ ते १५ आपल्या साऱ्या कामांना वेग येऊ लागेल.

**सिंह** : सूर्याचे तुमच्या राशीत लवकरच आगमन घडणार आहे. हे सूर्याचे आगमन तुमच्या जीवनात, आचारविचारांत, व्यवहारात नेहमीच उत्क्रांती घडवून आणीत असते. आगामी महिन्याभरांतही आपणांस असाच प्रत्यय देईल.

चौथ्या मंगळामुळे तुमच्या कर्तृत्वाला आणि व्यक्तिमत्त्वाला छेद देणाऱ्या अनेक घटना आजवर आपण अनुभवल्या असतील. तो अनिष्ट काळ आता निश्चितच ओसरलेला आहे. नोकरीधंद्यांत आपली पावले पुढे पडू लागतील, बढती-बदलीचे योग कोणत्याही क्षणी दृष्टिक्षेपात येतील. सांपत्तिक अडचणी पूर्णांशाने दूर होतील. राजकीय क्षेत्रातील तुमचे हरवलेले स्थान पुन्हा आपणांस लाभू शकेल.

दि. ९-१०-१४-१५ या कालाची नोंद करा.

**कन्या** : तृतीयस्थ मंगळाचा पर्वकाल आता थोडे दिवसच आहे. आगामी महिन्याभराच्या कालात तो आपली सारी शक्ती पणास लावून साऱ्या आघाडीवर तुम्हांला नेत्रदीपक यश मिळवून देईल.

नोकरीधंद्यातील प्रगतीच्या वाटा निर्वेध, निष्कंटक बनतील. नवे व्यवसायक्षेत्र हस्तगत होईल. हितशत्रूंचे डाव त्यांच्याच अंगावर उलटतील.

प्रवास-बदल-स्थित्यंतर हे या कालाचे विशेष स्वरूप होय आणि असा बदल घडून येण्यानेच आपले जीवन अधिक आकर्षक बनेल.

अनपेक्षितपणे अनेक नव्या योजना राबवल्या जातील. व्यावहारिक यशाबरोबरच सामाजिक प्रतिष्ठाही वाढीस लागेल.

दि. १२ ते १३ या कालाचे महत्त्व सर्वांत अधिक जाणवेल.

**तूळ :** शुक्र भाग्यातून जात असतानाच सूर्याचे आगमनही लाभस्थानी घडणार आहे. हे दोन योगही तुम्हांला हवे ते आणि हवे तेवढे देऊ शकतील. सिंहेचा सूर्य लाभात. अशी संधी ३६५ दिवसांनीच लाभत असते.

सांसारिक, व्यावसायिक वातावरण प्रसन्न बनेल. नोकरीधंद्याचे वातावरण सर्वत्र अनुकूल दिसू लागेल. नवे स्नेहसंबंध जुळून येतील; आणि कला–साहित्य क्षेत्रांतील व्यक्तींना आजवर कधीही न घडलेला लाभ या वेळी सहजासहजी लाभू शकेल. एकंदरीत सध्याचा काल व आगामी महिन्याभराचा काल आपणांस अपेक्षासाफल्याचा जाणवेल.

दि. १३ ते १५ नोंद करण्यासारखा महत्त्वाचा काल.

**वृश्चिक :** मंगळाचे हृदयपरिवर्तन झाल्यापासून तुम्हांला स्वास्थ्य मिळू लागले आहे. आता तर सूर्यही भाग्यदशमांतून संचारू लागलेला असल्यामुळे, तुमच्या साऱ्याच योजना गतिमान बनू लागलेल्या असतील.

अकराव्या गुरूचा हा अधिकाधिक अनुकूल काल असल्यामुळे तुमच्या अपेक्षा सफल व्हायला आता मुळीच अडचण पडणार नाही.

या आठवड्यापासून आपल्या व्यवसायधंद्यात उत्क्रांती घडून येऊ लागेल. आपल्या भव्य योजना यशस्वी ठरतील.

नोकरीधंद्यात आजवर शिकस्तीचा प्रयत्न करूनही जे लाभू शकले नाही ते आता फारसे परिश्रम न करताही लाभेल. अनपेक्षित स्वरूपाचे धनलाभही या वेळी होण्याची मोठी शक्यता आहे. नोकरीधंद्यातही चार पावले पुढे जाल.

दि. ११ ते १३ या काली अनेक कामे यशस्वी होतील.

**धनू :** सूर्याची भाग्यस्थानाकडे वाटचाल सुरू आहे. त्याचे भाग्यस्थानी आगमन घडताच तुम्हांला निष्कारण त्रास देणारे अनिष्ट ग्रह आता तुमच्या प्रगतीच्या आड येण्याचे साहस करणार नाहीत.

व्ययस्थ मंगळाच्या कटकटी आता निश्चितच कमी कमी व्हाव्यात. नोकरीधंद्यांतील पेचप्रसंग सुटावेत, पैशाअडक्याची विवंचना मिटावी.

नव्या व्यवसायधंद्याच्या स्थगित योजनांना या आठवड्यापासूनच गती मिळू लागेल. नोकरीसाठी केलेले प्रयत्न यशस्वी होण्याची लक्षणे दिसू लागतील. कौटुंबिक–व्यावसायिक संघर्ष मिटून प्रसन्न वातावरण दिसायला लागेल. व्यवसायधंद्याचे बदललेले तंत्र प्रभावी ठरल्याचा प्रत्यय यावा.

दि. १३ ते १५ पासून आपली स्थगित कामे मार्गस्थ होतील.

**मकर :** एकादशस्थ मंगळाची कारकीर्द आता थोड्या दिवसांतच संपुष्टात येणरा आहे. आगामी महिन्याभरातच त्याच्या सामर्थ्याचा आपणांस प्रत्यय यावा. भाग्यातील गुरु–हर्शलही आता तुमच्यासाठी काही महत्त्वपूर्ण कार्य करण्यास उद्युक्त झालेले दिसतात.

अंगीकृत व्यवसायधंद्यात काही प्रचंड उलाढाली करायच्या असतील तर त्या आताच करा. अशी संधी पुन्हा लवकर येणार नाही.

आपले कोणतेही व्यवसायक्षेत्र असो, त्यात सांपत्तिक लाभ चांगले होतील, प्रतिष्ठा खूपच उंचावेल. अनेकांचे सहकार्यही लाभेल.

साहित्य–कला–क्रीडा हे तुमचे खास क्षेत्र. त्यामध्ये आवाज उठवाल. अनेकांच्या नजरा तुमच्यावर रोखल्या जातील असे काही भव्य–दिव्य करून दाखवाल.

दि. १० ते १४ या कालाचे महत्त्व विशेष जाणवेल.

**कुंभ :** सिंह राशीतील सूर्य तुमच्या जीवनात, व्यवहारधंद्यात नवचैतन्य निर्माण करीत असतो, असा आजवरचा आपला अनुभव असेलच. या वेळीही तसा प्रत्यय यावा.

या आठवड्याच्या अखेरीस सूर्याचे सिंह राशीत आगमन घडेल आणि तेव्हापासून तुमच्या सभोवारचा सारा आसमंत प्रसन्नतेने न्हाऊन निघेल.

सांसारिक आणि व्यावसायिक वातावरणातही अनेक आनंददायक व प्रगतिपर घटना भराभर घडून यायला लागतील. नजीकच्या कालात गुरूही आपल्या भाग्यस्थानी प्रवेश करणार आहे. या सर्व अनुकूल ग्रहस्थितीचा स्पष्ट अर्थ असा आहे की, आपल्या उज्ज्वल भविष्यकालाची चाहूल या आठवड्यापासूनच लागू लागेल. नोकरीधंद्यात अनपेक्षितपणे फार मोठी प्रगती घडून येण्याची लक्षणे दिसू लागतील.

दि. १२ ते १५ अपेक्षेप्रमाणे सारे काही घडावे.

**मीन :** सध्या बहुसंख्य ग्रह आपणांस अनुकूल असले तरी दोन उग्र ग्रहांच्या कोंडीत आपण सापडला आहात. त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. आपल्या मीन राशीच्या पुढे शनी तर मागे राहू. या उग्र ग्रहांच्या कात्रीत सापडल्यामुळे आपणांस प्रत्येक गोष्टीसाठी धावपळ-धडपड खूपच करावी लागणार आहे.

अपयश येणार नाही, पण लाभणारे यश पदरी पाडून घेण्यासाठी जिवाचे रान करावे लागेल.

हा सध्याचा आठवडा व्यावसायिकदृष्ट्या बराच प्रगतीचा जाणवेल. दिवस फारच घाईगर्दीत जातील. अनेक योजना सिद्धीस नेण्यासाठी सतत झटावे लागेल. इष्टमित्रांचे साहाय्य भरपूर लाभेल.

दि. ११ ते १४ अपेक्षित यश पदरी पडावे.

□ □ □

# धर्मावतार पॅनेल

दिनांक १९ ऑगस्ट १८९९. बंगालमधील छाप्रा जिल्ह्याचा डिस्ट्रिक्ट इंजिनीअर आणि डेप्युटी कमिशनर कॉर्बेट या दोघांनी मिळून नारसिंग नावाच्या पोलिस शिपायाला बेदम मारले. नारसिंगचा गुन्हा क्षुल्लक होता. त्याने आपला स्वाभिमान कायम ठेवून डिस्ट्रिक्ट इंजिनीअरच्या बंगल्यावर घरगुती काम करावयाला स्पष्ट नकार दिला होता. नारसिंगच्या जखमांचे स्वरूप गंभीर आहे आणि त्यामुळे त्याचा प्राण जाण्याचीही शक्यता आहे, हे जेव्हा हॉस्पिटलच्या अधिकाऱ्यांकडून त्यांना समजले, तेव्हा मात्र त्यांची घाबरगुंडी उडाली; आणि ह्या प्रसंगातून कोणत्या ना कोणत्या प्रकारे आपली सुटका करून घेण्याच्या प्रयत्नाला ते लागले. कॉर्बेटने प्रथम नारसिंगला भेटून नोकरीचा राजीनामा देण्याची सूचना केली; आणि असे न केल्यास पोलिस खात्यामार्फत त्याला कडक शिक्षा करण्यात येईल, अशीही त्याला तंबी दिली. नारसिंगचा स्वाभिमान अद्यापही जागृत होता. त्याने या गोष्टीला स्पष्ट नकार दिला. झाले! नारसिंगविरुद्धचा खटला मौलवी झकीर हुसेन ह्यांच्या न्यायालयात सुरू झाला. न्यायालयावरही कॉर्बेटने दडपण आणलेच आणि परिणामी नारसिंगला दोन महिन्यांची सश्रम कारावासाची शिक्षा देण्यात आली.

न्यायदेवतेनेसुद्धा पाठ फिरविली पण नारसिंग डगमगला नाही. त्याने आपले सर्वस्व पणाला लावून न्यायदेवतेचे दार पुन्हा एकदा ठोठावयाचे ठरवले आणि सेशन्स जज्ज पॅनेल ह्यांच्या न्यायालयात अपील दाखल केले. पॅनेल हा गोरा अधिकारी होता. पण स्वतंत्र आयरिश रक्त त्याच्या नसानसांत खेळत होते. आपल्याच गोऱ्या बांधवाकडून गरीब

प्रा. पां. शं. माईणकर

बिचाऱ्या हिंदी जनतेचा होत असलेला उपमर्द त्याला पाहवत नव्हता. नारसिंगच्या प्रकरणात खरे दोषी कॉर्बेट आणि डिस्ट्रिक्ट इंजिनीअर सिमकिन्स हेच आहेत, हे त्याच्या लक्षात यायला वेळ लागला नाही. निर्दोष नारसिंगला शिक्षा देण्यास त्याचे न्यायी मन धजेना. पण... पण नारसिंगला निर्दोष सोडून देणे म्हणजे आपल्याच गोऱ्या बांधवांचा रोष ओढवून घेणे होय, हेही त्याला पुरेपूर माहीत होते. ह्या रोषाची मुळीच पर्वा न करता त्याने ७ ऑक्टोबर १८९९ ला आपला न्यायनिवाडा दिला आणि नारसिंगची निर्दोष मुक्तता केली.

नारसिंग तर सुटला. पण या निकालपत्राने खुद्द पॅनेल मात्र आपल्याच बांधवांच्या तिरस्काराचा धनी झाला. भारतातील सर्व ब्रिटिश अधिकाऱ्यांमध्ये पॅनेलच्या या निर्णयाबद्दल संतापाची एक तीव्र लाट निर्माण झाली. खुद्द गव्हर्नर सर जॉन वुडबर्न आणि व्हाईसरॉय कर्झन यांनाही पॅनेलचे हे कृत्य आवडले नाही. वुडबर्नने नौखाली येथे दौऱ्यावर असताना पॅनेलला आपल्या खाजगी खोलीत बोलावून स्पष्टच सांगितले की, तू नारसिंगच्या प्रकरणात दिलेला निवाडा पाहिल्यानंतर तुला शासनाच्या सेवेत ठेवून घ्यावे किंवा नाही याबद्दल माझ्या मनात शंका निर्माण झाली आहे. तरीसुद्धा पॅनेल मुळीच घाबरला नाही. त्याने वुडबर्नच्या तोंडावर छातीठोकपणे सांगितले की, मी केलेला निवाडाच न्यायाला धरून होता. उलट तुम्ही सर्वांनीच सत्य परिस्थिती बाहेर न येऊ देण्याचा आणि निर्दोष गरीब हिंदी माणसाचा नाहक छळ करण्याचा प्रयत्न केलात, नारसिंगच्या प्रकरणात दिलेला निवाडा हा पॅनेलने आपल्या स्वतंत्र आणि न्यायी विचारांची साक्ष देणारे जे काही निवाडे

दिले, त्यांपैकी फक्त एक होता. नंतरच्या अशाच एका प्रकरणात तर पॅनेलने स्पष्टच विधान केले की, युरोपियन अधिकाऱ्यांच्याविरुद्ध साक्ष देण्याची हिंमत फक्त तेच देशवासी करू शकतात, की ज्यांना आपली घरेदारे जाळली अगर लुटली गेली किंवा आपल्या नातेवाइकांना नोकरीतून काढून टाकले ।कवा त्यांच्यावर निरनिराळे कपोलकल्पित आरोप करण्यात आले तरी वाईट वाटणार नाही.

नौखाली येथे तर पॅनेलने आपल्या निःपक्षपाती न्यायदानाच्या भूमिकेचा कळसच गाठला आणि त्या जिल्ह्याचे डी. एस्. पी. रॅले यांना खोटा पुरावा देऊन खुनाच्या गुन्ह्यातून स्वतःची मुक्तता करून घेण्याबद्दल दोषी ठरविले आणि कोणत्याही परिणामाची पर्वा न करता फाशीची शिक्षा ठोठावली. फाशीची शिक्षा आणि तीसुद्धा एका इंग्रज अधिकाऱ्याला ! प्रत्यक्ष इंग्रज सरकारच्याच राज्यात ! झाले, भारतातील एकजात सारे इंग्रज अधिकारी चवताळले, भडकून उठले. पण, इंग्रज अधिकाऱ्यांच्या मनातून पॅनेल जरी पूर्णपणे उतरला असला तरी बंगाली जनतेच्या गळ्यातील तो ताईत बनला होता आणि म्हणूनच १५ जानेवारी १९०१ रोजी जेव्हा त्याने खुनी रॅलेला देहांताची शिक्षा सुनावली, तेव्हा आधुनिक रामशास्त्री म्हणून जनतेने त्याला डोक्यावर घेतले. हजारो लोकांनी एकत्र येऊन वाजत-गाजत त्याची मिरवणूक काढली. साऱ्यांनी उद्घोष केला, 'धर्मावतार पॅनेल की जय.' पण... पण पॅनेलला मिळत असलेली ही अमाप लोकप्रियता इंग्रज सरकारच्या डोळ्यांत सलत होती. रॅलेला देहांताची शिक्षा दिली, त्याच्या दुसऱ्याच दिवशी तारेने हुकूम आला. काय होते त्या हुकमात ? पॅनेलची बडतर्फी. एवढ्यानेच भागले नाही. लगोलग दुसराही हुकूम आला आणि रॅलेला जमानतीवर सोडण्यात आले.

बडतर्फीनंतर देशाला परत जाण्यासाठी म्हणून पॅनेल जेव्हा आपल्या बंगल्यातून नौखाली रेल्वे स्टेशनकडे निघाला, तेव्हा संपूर्ण नौखाली शहर अश्रुपूर्ण नयनांनी ह्या आपल्या लाडक्या देवतास्वरूप न्यायी अधिकाऱ्याला निरोप देऊन शेवटचा मानाचा मुजरा करण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा उभे होते.

□ □

 [ पृष्ठ ५ वरून ]

अधिकच ) म्हणून वावरू लागले आहेत. येथील वर्तमान नाजूक राजकीय घडामोडींत गृहमंत्री श्री. चव्हाण हे जे संयमी मौन बाळगून आहेत त्याचा भंग करून, ते रागावले वा रूसले असले तर त्यांची मनधरणी करण्यासाठी, पंतप्रधानांनी या नव्या होतकरू 'रघुनाथास' मध्यस्थाची भूमिका काही प्रसंगी सोपविण्यास प्रारंभ केल्याचे दिसू लागले आहे. हा 'मध्यस्थ' यशस्वी होवो अथवा न होवो, परंतु त्यामुळे यापुढे जुन्या 'रघुनाथाचे' काय होणार हा मुख्य चिंतेचा विषय आहे! सध्या हे निदान लोकसभेचे उपाध्यक्ष ( डेप्युटी स्पीकर ) तरी आहेत. हे त्यांचे 'पद' तरी टिकून राहो हीच सदिच्छा! कारण, त्यांस मारून मुटकून अध्यक्ष ( स्पीकर ) करण्यासाठी कम्युनिस्ट व त्यांचे सहप्रवासी खटपट करू लागल्याची लक्षणे दिसत आहेत व म्हणूनच वरील सदिच्छा व्यक्त करण्याची पाळी येऊन ठपलेली आहे.

गेल्या सोमवारी (दि. २१ जुलै) रात्री काँग्रेस पक्षाच्या कार्यकारिणीची सुमारे शंभर मिनिटांची बैठक न गाजताच पार पडल्याने पत्रकारांना जरा दुःख झाल्याचे दिसत होते. कारण, त्यांना 'सनसनाटी' वार्ता हाती लागली नव्हती आणि बैठकीत 'आळी मिळी गुप चिळी' असे ठरवून सर्व मंडळी बैठकीतून बाहेर आल्याने कोणालाही काही अधिक, निदान त्या रात्री, कळण्यास वाव नव्हता. अशा प्रसंगी जे सुमारे शंभर शब्द काँग्रेसचे सरचिटणीस श्री. सादिकअली यांनी (सर्व संमतीने आधी तयार करून ठेवलेले.) वाचून दाखविले ते विशेष चिंतनीय आहेत. त्यांतील काही शब्दांकडे लक्ष वेधून जी प्रश्नोत्तरे बैठकीच्याच स्थानी झाली ती तर अधिकच चिंतनीय आहेत. बैठकींतील चर्चा अत्यंत 'मैत्रीपूर्ण व सौहार्दपूर्ण' ( फ्रेंडली व कॉर्डियल) वातावरणात झाली, असा शब्दप्रयोग काय दर्शवितो? काय बैठकीत अशा वातावरणाची अपेक्षा नव्हती? श्री. सादिकलींनी पुढे सांगितले की सर्वच सदस्यांनी काँग्रेसमधील एकता टिकून राहावी यासाठी 'निर्भेळ इच्छा' (जेनूईन डिझायर) व्यक्त केली. काँग्रेस पक्षाचे सर्व थोर थोर पुढारी एकत्र बसून विचार करीत असताना काय 'एकी' ऐवजी 'बेकी'ची इच्छा व्यक्त करतील? आणि शिवाय त्यांची सर्वांचीच इच्छा 'निर्भेळ' वा 'निखालस' (जेनूईन) होती, असे सांगण्याची पाळी तरी श्री. सादिकलींवर का यावी? काय, याविषयी कोणी साशंक झालेले आहेत का? आदी प्रश्नांची सरबत्ती होताच बैठकीत उपस्थित असलेले एक साधेभोळे गृहस्थ बोलून गेले की, "पत्रकारांची कमाल आहे बुवा! शब्दयोजना वा शब्दप्रयोग यांचा एवढा कीस काढून तुम्ही मंडळी सर्वच उघडकीस आणून

प्रखर देशभक्ती
सूत्रबद्ध संघटना
अमोघ वक्तृत्व
देशाच्या राजकारणातले यशस्वी डावपेच
परराष्ट्र राजकारणावरील पक्की मांड
हे सर्व हिटलरपाशी होते.
तरी अखेर
त्याचा पराभव का झाला ?

## नाझी भस्मासुराचा उदयास्त

वि. ग. कानिटकर

मूल्य : पंचवीस रुपये.

टाकता की ! कितीही जपून शब्द वापरले तरी तुम्हा मंडळींपासून काहीं लपवून ठेवणे कठीणच आहे " या प्रश्नोत्तराचा अन्वयार्थ चाणाक्ष वाचक लावू शकतील. तेव्हा, यावर मल्लिनाथी नकोच.

सोमवारची (२१ जुलैची) ही बैठक संपवून गृहमंत्री श्री. चव्हाण घरी गेले ते येत्या सोमवारी (२८ जुलैला) प्रथमच घराबाहेर पडणार आहेत. एवढेच नव्हे तर मद्रासला दि. १ ऑगस्टला जाण्याचा जो त्यांचा प्रवास कार्यक्रम होता तो पण त्यांनी रद्द केल्याचे प्रसिद्ध झाले आहे. कारण, त्यांची प्रकृती अद्यापही पूर्ववत् झालेली नाही. दि. २२ व २३ जुलैला तर त्यांचा 'फ्लू' ज्वर अधिकच होता. दि. २४ पासून ज्वर नसला तरी अशक्तता वाढली असून दि. २५ वा २६ ला त्यामुळेच म्हणे त्यांनी संपूर्ण विश्रांती पण घेतली, असे 'हेल्थ बुलेटिन' असूनही हा आजार 'राजकीय' (पोलिटिकल) तर नाही ना, अशी कुजबुज संसदीय क्षेत्रात (पार्लमेंट लॉबीज्) सर्व सप्ताहभर ऐकू येत होतीच ! या मंडळीच्या तोंडाला कुलूप कोण लावू शकणार ?

—प्रतिनिधी

---

## झुंड....

'झुंड' या लेखमालेच्या प्रसिद्धीत अनपेक्षित कारणाने खंड पडत आहे. याबद्दल क्षमस्व.

दि. ३० ऑगस्टपासून या लेखमालेचे उरलेले सुमारे चार। पाच लेखांक नियमित प्रसिद्ध होतील याची वाचकांनी खात्री बाळगावी.

—संपादक

---

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

# कोयना

धरणावर सतत जागता पहारा ठेवण्यासाठी एक खास विभाग पहिल्यापासून अस्तित्वांत आहे. दोन ठिकाणांहून धरणावर सतत 'नजर' ठेवली जाते व त्याचा वायरलेसशीही संबंध प्रस्थापित केलेला आहे. (दोन टेहेळण्या एवढ्यासाठी की त्या दोन वेगवेगळ्या बाजूंकडून आहेत व समजा, न जाणो एकाचे चुकून दुर्लक्ष झाले तर निदान दुसऱ्याचा उपयोग होईल. ) सतत नजर ठेवण्याचे हे काम इतके कंटाळवाणे आहे की, नुकत्याच त्यांच्या पाळ्या, ज्या पूर्वी प्रत्येकी एकावेळी आठ तासाच्या होत्या त्या आता एकावेळी फक्त ४ तासांच्या केल्या आहेत. या कामा-संबंधी बोलताना किंचित विनोदाने एक कनिष्ठ अधिकारी असे म्हणाले की जितक्या एकनिष्ठेने आम्ही धरणाकडे पाहत राहतो तितक्याच एकनिष्ठेने व तितका वेळ देवाकडे पाहत राहिलो असतो तर तो केव्हाच प्रसन्न झाला असता. त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी यावर असे म्हटल्याचे सांगण्यांत येते की, हा समूर्त अभंग देव पुढे उभा आहे असेच समजाना ! नाहीतरी त्यानेच अनेकांच्या अन्नोदकाची सोय केली आहे !

धक्क्यांची आता एवढी सवय झाली आहे की तो चर्चेचा विषय होत नाही. उलट एखाद्या आठवड्यात जाणवणारा एकही धक्का बसला नाही तर लोक एक-मेकांना चहा पाजतात. पण असे प्रसंग थोडे ! चंद्रावर ठेवण्यात आलेल्या भूकंप-मापन यंत्रावर धक्क्यांची नोंद झाली असे कळल्यावर इथल्या लोकांचे लगेच चंद्राशी नाते जमले, इतके की, भूकंपमापन व त्याचे परिणाम मापन करणाऱ्या इथल्या काही 'लोकप्रिय अधिकाऱ्यांची' बढती होऊन त्यांची चंद्रावर नेमणूक होणार, असा लगेच गवगवा सुरू झाला. नाहीतरी येथे करमणुकीसाठी ना सिनेमा, ना नाटक ! त्यांतून सतत धुवाँधार पावसात व छत्र्या उफराट्या करून (वा न करताही) सचैल स्नान रोज घडवणाऱ्या सोसाट्याच्या वातावरणात हॉटेलातल्या शिळ्या चहाला गरम कढ देऊन व आपापल्या ब्रँडची शुभ्रवस्त्रांकिता पेटवून धूर काढण्याव्यतिरिक्त काय उद्योग? मग 'वेल्फेअर कमिटी' चालते किंवा मारुती मंडळही पुरते. आता येणाऱ्या गणेशोत्सवाचा उत्साह उतू जात आहे. निवडणुकांचा 'फार्स' झाला तरी उरलेल्या सोंगट्या उरलेल्या जागा अडवणार हे सर्वजण उत्तम जाणून आहेत. तरीही गणपतीबाप्पा काही 'रिलीफ' देतील अशी आशा लोक बाळगून आहेत. नाहीतर आहेच रोजची आवई 'प्रॉजेक्ट अलाऊन्स मिळणार' 'केसीए' (कोयना कॉम्पेन्सेटरी अलाऊन्स) वाढवून १५ ऐवजी २५ टक्के मिळणार,' रिस्क अलाऊन्सची केस एफ्. डी. कडे गेली इत्यादी. गणपती-बाप्पा काय 'रिलीफ' देतात ते पाहावयाचे.

—कोयना वसाहतीतील एक

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H-649



“पुन्हा सांगतो, ‘कारखान्याच्या अधिकाऱ्यांना तुम्ही पटवून दिलं पाहिजे’ असं मी कामगारसभेत म्हणालो; पण कामगार होते संतप्त मन:स्थितीत. त्यांनी ऐकलं ‘पेटवून दिलं पाहिजे.’ त्याला मी काय करूं ? ...”